# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक २०-०९-२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक २० सप्टेंबर २०१६ रोजी ( का.प.क्र.२८) मा.महापौर श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ११-०५ वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरीया,आयएएस नगरसचिव,श्रीमती अपर्णा थेटे व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
५. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ.स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१५. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१६. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१७. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१८. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१९. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२०. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
२१. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२२. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२३. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२४. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२५. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२६. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२७. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२८. स.स.श्री.खान जहांगीर मुलानी
२९. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
३०. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे

३१. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
३२. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३३. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३४. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३५. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३६. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३७. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३८. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
३९. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
४०. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
४१. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४२. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४३. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४४. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४५. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४६. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
४७. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
४८. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
४९. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
५०. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
५१. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
५२. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
५३. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५४. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५५. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५६. स.स. श्री.शेख जफर अखतर
५७. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
५८. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
५९. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६०. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
६१. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
६२. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
६३. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
६४. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
६५. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६६. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
६७. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
६८. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल

६९. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७०. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७१. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७२. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
७३. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
७४. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
७५. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
७६. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
७७. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
७८. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
७९. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८०. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८१. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
८२. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
८३. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
८४. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
८५. स.स.श्री.थोरात दिलीप गंगाधर
८६. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
८७. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
८८. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
८९. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९०. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
९१. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
९२. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
९३. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
९४. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
९५. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
९६. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
९७. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
९८. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
९९. स.स.कु.जमादार सायली भागवत

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन
५. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.राजेंद्र जंजाळ :उरी येथे दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या १७ जवानांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.गजानन बारवाल :अनुमोदन आहे तसेच या घटनेचा निशेध करावा.

श्री.नंदकुमार घोडेले :दहशतवादी हल्ला उरी येथे झाला १७ जवान शहीद झाले भारत देशाला दु:ख झालेले आहे. पाकीस्तानाचा निषेध करावा.

श्री.भगवान घडमोडे :जी सुचना मांडली त्यास अनुमोदन आहे. तसेच मा.पंतप्रधान यांना पत्र पाठवून ठोस पावले उचलण्याची गरज आहे हे शहर आपल्या पाठीशी आहे असे कळविण्यात यावे.

श्री.भाऊसाहेब जगताप :अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वानी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी उरी येथे दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले १७ भारतीय जवानांना श्रध्दाजंली अर्पीत करण्यात आली.

मा.महापौर :आयएसएफच्या ज्युनियर विश्वच्या नेमबाजी स्पर्धेत संभाजी शिवाजी झनझन याने दोन सुवर्ण पदक मिळवून महाराष्ट्राची व देशाची प्रतिष्ठा उंचावली आहे. त्याचे सुध्दा अभिनंदन करण्यात येते.

प्रश्न क्रमांक ६१८ :श्री.कैलास गायकवाड

श्री.कैलास गायकवाड :प्रश्न केला होता उत्तर दिले की ८ वीचा वर्ग प्राथमीकला जोडला. या वर्गासाठी पदवीधर डीएड शिक्षकाची विषयवाईज नियुक्ती केली का ?

शिक्षणाधिकारी :तासिका तत्वावर ४६ शिक्षक आहे नियुक्ती विषयावाईज केली. ग्रॅज्युएट झालेले प्राथमिक शिक्षकाची नेमनूक केली आहे. वेगळे शिक्षक नियुक्त केले नाही.

श्री.कैलास गायकवाड :८ वीच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. १२ पास डीएड शिक्षक यांना ७ वी पर्यंत शिकविण्याचे प्रशिक्षण दिले जाते त्यांनी ८ वीच्या वर्गासाठी प्रशिक्षण घेतले नाही. त्यांना शिकविणीचे काम देऊ शकत नाही. आठवी ते दहावी पर्यत किती शिक्षक आहे. १२ माध्यमिक शाळा चालतात १५२७ विद्यार्थी आहे साधारणत: २७ तुकडया आहे असे उत्तर दिले. १० वर्षापासून माध्यमीक शाळा आहे संच मान्यता आहे. विद्यार्थ्यांची संख्या निश्चित आहे. तुकडयाची संख्या किती हे अधिकारी यांना माहित नाही का ?

शिक्षणाधिकारी :२७ तुकडया आहे. तासिका तत्वावर ४६ शिक्षकआहे ८ वी ते १० पर्यत पदवीधर डीएड तासिका बेस वर असलेले शिक्षकच शिकवितात.

श्री.कैलास गायकवाड :८ ते १० वी पर्यंत विद्यार्थी संख्येनुसार किती शिक्षक आवश्यक आहे. १२ शाळेत तीन वर्ग चालतात ३६ शिक्षक आवश्यक आहे उत्त्तर देतांना २७ शिक्षक दिले.

शिक्षणाधिकारी :माध्यमिकचे वर्ग २७,.१५२७ विद्यार्थी हे ९ व १० वीचेच आहे. ८ वीचा वर्ग सातवी वर्गास जोडलेला आहे.

श्री.कैलास गायकवाड :संच मान्यतेचा प्रस्ताव दाखल केला जातो दोन दिवसात संच मान्यता मिळते परंतु उत्तरांत असे दिले की सन २०१५-१६ साठी संच मान्यता झाल्यानंतर आवश्यक शिक्षक उपलब्ध होतील असे दिले संच मान्यतेसाठी प्रस्ताव दिला

असे म्हटले प्रश्न केल्यानंतर प्रस्ताव दिला. यापुर्वीच प्रस्ताव दाखल करणे आवश्यक होते. शिक्षक किती पाहिजे क्लिअर झाले असते.

शिक्षणाधिकारी :प्राथमिकला संच मान्यता मिळाली आहे. माध्यमिकचा प्रस्ताव दिला आहे. एक महिनापूर्वी प्रस्ताव पाठविला आहे. शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचेशी चर्चा केली. पाठपुरावा चालू आहे.

श्री.कैलास गायकवाड :संच मान्यतेचा प्रस्ताव हा ऑनलाईन द्यावा लागतो पाठपुरावा करण्याची गरज नसते. उशीरा प्रस्ताव दिला. तसेच ८० कोटी मनपास शासनाकडून भाडे पोटी येणे आहे त्यासाठी काय प्रयत्न केले.

मा.आयुक्त :जो प्रश्न आहे त्यानुसार ८ वी ते १० पर्यंत किती विद्यार्थी व किती शिक्षक लागणार? व सध्या किती आहे? बैठक संपल्यानंतर माहिती घेतली जाईल. संच मान्यतेसाठी उपसंचालक शिक्षण याचेशी चर्चा केली जाईल. ८० कोटी बाबत पाठपूरावा चालू आहे. मा.सचिव,शिक्षण विभाग यांचेशी चर्चा झाली आहे.

श्री.कैलास गायकवाड :यापुर्वी चर्चा झाली होती शाळेत शिक्षक देणार होते परंतु दिले नाही. खोटी माहिती आता दिली. १७ शिक्षकाची आवश्यकता आहे. जे विद्यार्थी शिक्षण घेत आहे त्यांचे नुकसान होत आहे. शिक्षकाची तातडीने नियुक्ती करावी.

श्रीमती सीमा खरात :८ वीची मान्यता कशाच्या निकषा अधारे दिली जाते?

शिक्षणाधिकारी :यासाठी शासन निर्णय दिनांक ११-९-२००९ चा आहे ७ वी नंतर विद्यार्थी नैसर्गीक वाढ ८ साठी होते महासभेने निर्णय दिल्यानंतर परवानगी देतो. मुख्याध्यापकांना पत्र देऊन कार्यवाही होते तसेच जिल्हा परीषद यांचेकडे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविला जातो.

श्रीमती सीमा खरात :सरल मध्ये माहिती भरतो तुकडीमध्ये विद्यार्थी संख्येचे प्रमाण काय असते पदवीधर शिक्षक किती आहे.

शिक्षणाधिकारी :३० विद्यार्थीसाठी एक तुकडी असते तासीका बेसवर ४६ शिक्षक आहे ९ वी व १० वी च्या मिळून २७ तुकडया आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :अतिरिक्त शिक्षक किती माहिती द्यावी. अतिरिक्त असेल तर इतरत्र समायोजन करू शकतो.

शिक्षणाधिकारी :उर्दु माध्यमचे २० शिक्षक कमी आहे. सर्व माहिती दिली जाईल.

मा.महापौर :यादी मागवावी.

श्री.राजगौरव वानखेडे :अतिरिक्त शिक्षक असेल व त्यातील पदवीधर डीएड असेल तर त्यांना ८ वी ते १० पर्यंतचे शिकवणीचे काम द्यावे. ८३ कोटी शासनाकडून मिळविण्यासाठी अधिकारी नेमावे बजेट मध्ये शाळेच्या कामासाठी तरतुद आहे त्या कामाचे अंदाजपत्रक झाले का? शाळा सुरू होणेपुर्वी शाळेतील सर्व कामे व्हावीत. जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यांचा अदयाप सत्कार केला नाही.

श्री.जगताप भाऊसाहेब :मुकूंदवाडी शाळेत १५०० विद्यार्थी आहे. ९ वी १० वी साठी इंग्रजी शिक्षक नाही.

श्री.गजानन बारवाल :सन-२००१ पासून किती शिक्षकाचे समायोजन केले?

मा.महापौर :ज्या सुचना केल्या त्याची २ दिवसात माहिती सादर करावी.

श्रीमती सुरेखा सानप :नारेगाव येथील शाळेच्या परीसरात मुरूम टाकला नाही.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी पाहणी करावी लगेच काम सुरू करण्याची कार्यवाही करावी.

श्री.नासेर सिध्दीकी :गणेश कॉलनी शाळेत शिक्षक कमी आहे.शाळेत स्वच्छता ठेवावी. विद्यार्थ्यासाठी सर्व सुविधा असाव्यात.

मा.महापौर :दोन कोटी तरतूद शाळेसाठी आहे अंदाजपत्रक तयार करावे सुविधा दयाव्यात.

श्रीमती समीना शेख :मा.आमदार श्री.इम्तियाज जलील यांनी ५२ संगणक मनपा शाळेसाठी दिले होते ते चालविण्यास व शिकविण्यास शिक्षक उपलब्ध आहेत का?

मा.महापौर :जो प्रश्न असेल तोच विचारावा.शिक्षणाधिकारी यांनी कार्यवाही करावी.

श्री.सुभाष शेजवळ :भाडेचे शाळेत लाईट नाही भाडे भरतो ते मालक लाईट बील भरत नाही.

मा.महापौर :प्रशासनाने कार्यवाही करावी.मालक बिल भरत नसेल तर भाडे थांबविले पाहिजे. किंवा भाडेमधून बील वजा करून घ्यावे.

श्री.इरशाद खान :यशोधरा कॉलनी शाळेत मुख्याध्यापक नाही लाईट बील थकले तेथील विदयुत कनेक्शन कट केले.

श्री.ज्योती नाडे :माझ्या वार्डात शाळेत शिक्षक कमी आहे.

मा.महापौर :कमी जास्त शिक्षक आहेत समायोजन करावे.

श्रीमती सुमित्रा हाळनोर :ज्योतीनगर शाळेला गेट नाही भिंत पडली आहे ते काम करून दयावे.

श्रीमती जयश्री कुलकर्णी :जवाहर कॉलनी गारखेडा शाळेत उर्दु माध्यमचे ०२ शिक्षक आहे कमी पडतात.

मा.महापौर :सदस्यांनी सुचना केली पत्र दिले त्यानुसार कार्यवाही करावी.

शिक्षणाधिकारी :एकूण ४३१ शिक्षक आहे समान शिक्षक देण्याचा प्रयत्न करीत आहे.

श्री.अयुब जागीरदार :१९९५ मध्ये ७ वी पर्यत ३५ हजार विद्यार्थी ७०३ शिक्षक होते २०१६ मध्ये १७ हजार विद्यार्थी १० पर्यंत वर्ग ७७ शाळा ४३१ शिक्षक आहेत शाळेत सुविधा नाही पैठण गेट शाळेत २५२ विद्यार्थी ४ शिक्षक तेथे ०८ शिक्षक आवश्यक आहे.यामूळे शाळेचा दर्जा खालावत आहे. सर्व सरकारी नोकर यांचे पाल्यांना सरकारी शाळेत प्रवेश दिला तर शाळेचा दर्जा उंचावेल पुणे मुंबई मनपाच्या शाळेत प्रवेशासाठी नंबर लावावे लागतात.

मा.महापौर :मनपाच्या शाळेत सर्व सुविधा देण्यात याव्यात.तसेच शासनाकडून जे येणे आहे त्यासाठी प्रयत्न करावे नारेगाव ज्योतीनगर चिकलठाणा शाळेत व इतर सर्व शाळेत पाण्याची व्यवस्था करावी.

प्रश्न क्रमांक ६२० : स.श्री. कैलास गायकवाड

श्री.कैलास गायकवाड : पार्कीगच्या जागे संदर्भात मा. न्यायालयात रिट याचिका क्र.५००९/२००१ दाखल होती पार्कीगच्या जागा किती मोकळया केल्या याचा अहवाल मा.न्यायालयात सादर केला का असा प्रश्न केला होता.उत्तर बरोबर मिळाले नाही.

विधी सल्लागार :मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे नगररचना विभाग व अतिक्रमण विभाग मार्फत वेळोवेळी २००९ पर्यत अहवाल दाखल होत होता विधी विभागाकडून माहिती देण्यात येत नव्हती त्यामूळे संबधीत विभागाकडून माहिती घेणे उचीत होईल.

श्री.कैलास गायकवाड :पार्कीगच्या जागेवर किती अतिक्रमण झाले तक्रारी किती आल्या कार्यवाही कितीवर झाली. त्याचा रिपोर्ट मा.न्यायालयात सादर केला का?दर आठवडयाला याचा अहवाल मा.न्यायालयात सादर करणे आवश्यक आहे.परंतु अनेक लोकांनी अतिक्रमण संदर्भात तक्रारी दिल्या कार्यवाही केली नाही. गारखेडा येथील सर्वे नं ५१ मधील फुलपगर नावाच्या व्यक्तीकडून ३ एकर जमिन विकत घेतली ताबा पावती केली त्यास पैसे दिले परंतु मनपाने नाव लावून घेतले नाही पुन्हा त्याच व्यक्तीने त्या जागेचे पजेशन लावून घेतले अतिक्रमण करून प्लॉटींग केले या संदर्भात तक्रार केली होती परंतु प्रशासनाने नोटीस दिली ते व्यक्ती कोर्टात गेले. पहिल्यांदा त्याचे बाजूने निर्णय जे की स्थगिती आदेश झाले. त्यानंतर मनपाच्या बाजूने निर्णय लागला आजही ती जागा ताब्यात घेतली नाही अतिक्रमण काढले नाही. तसेच देशमुख नगर लक्ष्मीनगर भागात मनपाची ओ.स्पेस अतिक्रमण झाले.तक्रारी दिल्या कार्यवाही होत नाही. मनपाचे नाव लावले जात नाही. नोटीस दिली जात नाही त्यामूळे अतिक्रमण वाढत जात आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :आताच सुचना केल्यानुसार ३ एकरचा भुखंड माझ्या वार्डाला लागून तेथे अतिक्रमण झाले. अतिक्रमणाच्या तक्रारी किती असा प्रश्न होता विधी विभाग उत्तर देईल असे उत्तर दिले गेले. अतिक्रमण हे अतिक्रमण विभागच काढत असतो.१६-१७ महिण्यापासून अतिक्रमण बाबत आम्ही तक्रारी करतो कार्यवाही होत नाही केली तरी ती संशयास्पद असते. रस्त्यावरील अतिक्रमण,हातगाडया असतात अपघात होत आहे नोटीस दिली मुदत संपली तरी ही कार्यवाही होत नाही काही नोटीसच्या अधारे लोक मा.न्यायालयात जातात काही वेळेस अतिक्रमण काढतांना सदस्यांचे नाव सांगितल्या जाते.काही वेळा सदस्यांचे नाव सांगून बीआय पैसे घेतात निर्णय घेण्याची गरज आहे.जो अधिकारी कर्मचारी अतिक्रमणास सहाय करीत असेल तर फौजदारी गुन्हा दाखल होणे अपेक्षीत असते मी पत्र दिले की, मनपाचे एक कर्मचारी मनपाच्या एका भिंतीचे बांधकाम तोडून तेथे बांधकाम सुरू केले त्या बाबतीत कार्यवाही केली नाही.

श्री.अजीम अहेमद :कटकटगेट एसटी कॉलनी टाईम्स कॉलनी नाल्यावर एका व्यक्तीने २० हजार स्क्वेअर मीटर जागेवर स्वतचे नाव लावून घेतले.अतिक्रमण केले.

श्री.अब्दुल नाईकवाडी :माझ्या वार्डात जेएनईसी कॉलेजच्या बाजूला एका व्यक्तीने अतिक्रमण करून रस्त्यावर बोर्ड लावले त्यास समजावून सांगण्यास गेले असता कर्मचारी यांचेवर कन्टेम केले खोटे कागदपत्रावर त्यांनी स्टे मिळविला.विधी सल्लागार यांना माहिती दिली. श्री.नाईकवाडी यांनी ५ लक्षची खंडणी मागितली अशी खोटी बातमी पेपरला त्यांनी दिली संबधीतावर योग्य ती कार्यवाही करावी.सर्व कागदपत्र मा.आयुक्त यांचेकडे देत आहे.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :मुख्य ड्रेनेज लाईनचे तेथे काम सुरू केले होते परंतु जागा मालकाने त्यांची जागा असल्याचे कागदपत्र दाखल केले.त्यापुर्वी तेथे छोटीशी ड्रेनेज लाईन होती व आमच्यावर कन्टेम पिटीशन दाखल केले आहे.प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे विधी

विभागाकडे सर्व कागदपत्रे दिली आहे. कन्टेम पिटीशन प्रकरण क्लिअर झाल्यानंतर योग्य कार्यवाही होईल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :संबधीताकडे खोटे पेपर असून ३० फुटाचा तेथे रोड आहे यापुर्वी प्रस्ताव देऊन तेथे काम करण्याची मान्यता घेतली होती आता काम करू देत नाही रस्ता होऊनही तेथे तो व्यक्ती अतिक्रमण करीत आहे २००७ मध्ये निकाल लागला त्यावेळी महापालिकेचे कोणीही मा.कोर्टासमोर दाखल झाले नाही त्यामूळे निकाल विरोधात गेला सर्व कागदपत्र दिले अपील करण्यात येत नाही.

श्रीमती सीमा चक्रनारायण:सुतगिरणी रस्त्यावरील, पार्कींगच्या जागेवरील अतिक्रमण हटविले नाही. आठवडी बाजारच्या ठिकाणी अतिक्रमण आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :दिपाली हॉटेल अतिक्रमण पाडले होते पुन्हा बाजूला अतिक्रमण केले. या विभागातील बी आय वर कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :शासनाच्या जी आर नुसार निवासी भागात अतिक्रमण बाबत कार्यवाही करता येत नव्हती. आता १ महिणा पुर्ण कार्यवाही हाती घेणार आहे. गुंठेवारीभागातील सर्व नवीन बांधकाम तोडणारआहे परवानगी घेतली नसेल त्यावर कार्य्रवाही होईल.

श्री.अफसर खान :माझ्या वार्डात ७०-८० लक्ष किमतीचा प्लॉट तेथील अतिक्रमण काढले जात नाही मा.आयुक्तांनी व्हिजीट दिली होती तेथील भिंत अदयाप काढली नाही नकाशा बदलला टी पी विभागास मा.आयुक्तांनी कार्यवाही करण्या बाबत आदेशीत केले होते. मार्कींग का केली नाही.

मा.आयुक्त :निवासी भागात कार्यवाही करता येत नाही.

श्री.अफसर खान :निवासी भागाचा प्रश्न येत नाही हा ओपन प्लॉट आहे १६ महिन्यापासून बोलतो कार्यवाही होत नाही. पत्रही दिले.

श्रीमती सानप सुरेखा :उत्तरानगरी भागात अनधिकृत बांधकाम चालू आहे ते बंद करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :रस्त्यावर जे अतिक्रमण होत आहे ती कार्यवाही करण्यात यावी. सप्टेंबर पर्यत बांधकाम होणार नंतर नोटीस देणार ते कोर्टात जाणार ही प्रक्रिया लांबेल व कार्यवाहीही करता येणार नाही.

मा.आयुक्त :एक महिण्यानंतर जेथे अतिक्रमण असतील ती काढण्याचे काम करणार आहे.

श्री.भगवान घडमोडे :शासनाचे आदेश असेल तरी जेथे बांधकाम चालू आहे त्यांना नोटीस देऊन थांबवू शकता.

मा.आयुक्त :तीन प्रकारची वर्गवारी केली. पहिले मनपाच्या ओपनस्पेस वरील नंतर गुंठेवारीतील नवीन अनधिकृत होत असलेले बांधकाम व त्यानंतर अनधिकृत प्लॉटींग बाबत कार्यवाही करणार आहे.

श्री.अफसर खान :नगररचनाकडून गोलमोल उत्तर मला दिले. समोरच्या व्यक्तीकडील कागदपत्र मागवून घ्यावे असे सांगतात. टी पी विभागाकडून खुलासा घ्यावा कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे व जागा ताब्यात घ्यावी.

प्रशासकीय अधिकारी :स.सदस्य यांचे दोन प्रकरणी मुद्दे होते कूतूबपूरा येथे अनधिकृत शेड होते ते काढून टाकण्यात आले.

| | |
|---|---|
| श्री.जफर खान | :माझे वार्डात गल्ली नं. १ ते १९ मध्ये नाला आहे रस्ता आठ फुटाचा आहे. नाल्याची जागा घरामध्ये घेतली चेंबर घरामध्ये आले आठ फुट रस्ता बंद केला १ ते ३ गल्लीपर्यत अतिक्रमण काढले पुढील राहिले आहे. |
| प्रशासकीय अधिकारी | :स.सदस्य श्री. अफसर खान यांनी उपस्थित केलेला मुद्दा नुसार नगररचना विभागाने मार्कींग करून दिल्यास कार्यवाही करता येईल. |
| श्रीमती ज्योती मोरे | :वार्ड ९५ मध्ये आदर्शकॉलनीमध्ये अतिक्रमण केले. |
| श्री.अफसर खान | :टी पी विभाग परवानगी देते त्याच विभागाकडून उपआयुक्त अतिक्रमण यांना पत्र देतात की आपणच कागदपत्र घेऊन माहिती घेऊन कार्यवाही करावी. |
| श्री.अयुब जागीरदार | :म्हाडा कॉलनीमध्ये ३० फुट रस्त्यावर अतिक्रमण केले टी पी विभागाने परवानगी दिली आता कार्यवाही होत नाही. |
| श्रीमती समीना शेख | :बसैयेनगर मध्ये ॲपेक्स हॉस्पीटल मागे मनपाची ओ.स्पेस तेथे अतिक्रमण झाले. |
| मा.महापौर | :ज्या तक्रारी आलेल्या आहे एक महिण्याच्या आत कार्यवाही करावी. |
| श्रीमती नागरे स्वाती | :वार्ड ९ मध्ये स्मशानभुमी रोडला खडीचे ट्रॅक्टर उभे असतात प्रेत वाहिनी नेण्यास जागा नसते तसेच भाजी मंडई मध्ये जागा असतांना काही लोक रस्त्यावर भाजी विक्रीसाठी बसतात. |
| श्री जमीर कादरी | :अमखास मैदान जवळ फसीलच्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. सहा महिण्यापासून पाठपूरावा करतो कार्यवाही केली नाही.नोटीस दिली मुदत संपली त्यात वेळ गेला समोरच्या व्यक्तीने आता स्टे मिळविला २० हजार स्क्वेअर फुट जागा आहे. ही महापालिकेची मिळकत असून निजाम सरकारने कब्जा केला आहे. |
| प्रशासकीय अधिकारी | :स्टे आलेला आहे. |
| मा.महापौर | :स्टे येण्या अगोदर कार्यवाही का होत नाही.बांधकाम परवानगी आहे का? महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण आहे अशा जागा ताब्यात घ्याव्यात.ज्या ठिकाणी महापालिकेची जागा आहे सरकारी जागा आहे शाळेची जागा आहे तेथे असलेले अतिक्रमण काढण्यासाठी प्राधान्य दयावे. गुंठेवारी तील अतिक्रमण काढणेपुर्वी तेथील नागरीक पैसे भरण्यास तयार आहे एक तर बांधकाम परवानगी द्यावी नसता बांधकाम केले असेल तर नियमीतीकरण करावे. महापालिकेचे उत्पन्नही वाढेल व अशा वसाहती रेग्युलाईज ही होतील. |
| श्री.जहागीर खान | :पोलीस मेस ते कटकट गेट ५० फुटाच्या रस्त्यावर एमएसईबी ची डीपी आहे व २० फुट रस्त्यामध्ये अतिक्रमण केलेले आहे. |
| प्रश्न क्रमांक ६२१ | :स.श्री.भगवान घडमोडे |
| श्री.भगवान घडमोडे | :एलईडी संदर्भात चार प्रश्न दिले होते समाधानकारक उत्तर मिळाले नाही. मा.न्यायालयात या प्रकरणात मनपास अपयश आले मा.न्यायालयात नेमके काय झाले पेपरमधून वाचले. कंपनीला महिना २.२५ कोटी दयावे लागेल तेवढी परीस्थिती आहे का? लाइटचे काम दिलेल्या एजन्सीची मुदत संपली. अशा परीस्थितीत काय करणार पुर्वीच्या ठेकेदाराने ही बील घेत असतांना अटी शर्तीची पुर्तता केली की नाही उल्लेख निकालामध्ये आलेला आहे. अटी शर्तीचे |

पालन करीत नव्हते तर त्यावेळीच कार्यवाही का केली नाही. प्रशासनाने मा.न्यायालयात काय बाजू मांडली माहिती दयावी.

मा.आयुक्त :२० मे २०१४ रोजी सर्वसाधारण सभेत निर्णय झाला होता १ ऑगस्ट २०१४ रोजी टेंडर एलईडी बाबत काढले होते. सर्व कार्यवाही करून टेंडर ओपन केले त्यानंतर फायनल निर्णय झाला स्थायी समितीची मान्यता झाली ३ सप्टेंबर २०१४ रोजी वर्क ऑर्डर देण्यात आला. त्यानंतर संबधीत काही एजन्सीज कोर्टात गेले व त्यावेळी महापालिकेच्या बाजूने निकाल लागला त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकरण दाखल झाले त्याच वेळी तत्कालीन मा.आयुक्त श्री. केंद्रेकर यांना असे वाटले की यात काही तरी इश्युव्ह मनपाचे नुकसान होणार आहे त्यांनी कमेटी केली अहवाल आला त्यात असे दिसून आले की पब्लीक मनीचा इश्युव्ह आहे हे चुकीचे झाले आहे. परत स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवला त्यास १८ फेब्रुवारी २०१६रोजी मान्यता मिळाली व जी बीनेही मान्यता दिली त्याची प्रत ३१ मार्च १६ रोजी मिळाली परंतु त्यापुर्वी २६ मार्चला मा.न्यायालयात कन्टेम पिटीशन झालेले होते.यात पब्लीक मनीचा इश्युव्ह होता कंपनीने जे रेट दिले ते २,३ पट जास्त दिले  ४० हजार फिटींग बदलायच्या होत्या. दोन तीन कंपनीचे रेट मागविले तुलना केली.त्यानुसार या कंपनीचे  रेट जास्त होते. बी मध्ये नवीन पोल उभारणे होते त्यात २० टक्के जास्त दराने मंजूर केले होते त्यात २५.२८ कोटी खर्च होणार होते तो १० कोटीचाच खर्च होता पुर्ण अटी शर्तीमध्ये नमुद केले की मनपाने एजन्सीला दरमहा रक्कम दयायचे होते व एक फिक्स अकाऊंट ओपन करून त्यात रक्कम ठेवायची होती ती रक्कम ॲटोमॅटीक त्या एजन्सीच्या अकाऊंटमध्ये जाणार होती. अशा अटी शर्ती केल्या की त्यात मनपाचे नुकसान होणार होते. जेंव्हा कन्टेम झाले त्यावेळी मा.न्यायालयात सर्वतो परीने मनपाच्या बाजूने वकील लावून बाजू मांडली तत्कालीन आयुक्त यांनी बाजु मांडली तरीही मा.कोर्टाने अशा प्रकारचा निर्णय दिला.कन्टेम होऊ नये त्यामूळे वर्क ऑर्डर दिली आहे.

श्री.भगवान घडमोडे :दुसरी पार्टी मा.उच्च न्यायालयात कशासाठी गेले होते.

मा.आयुक्त :अटी शर्तीच्या संबधी गेले होते. जे एलईडी देणार ते मॅनीफॅक्चरींग कंपनीचे असावे. आणि जे इलेक्ट्रॉन लाईटींग सिस्टम आहे ते मॅनीफॅक्चरींग नाही हे सर्व मुद्दे मा.न्यायालया समोर मांडले.

श्री.भगवान घडमोडे :मॅनीफॅक्चरींग कंपनी नव्हती तर प्री-बील्ड मध्ये ती कंपनी रद्द करायला पाहिजे होती. टेंडर का ओपन केले स्वीकृत का केले ही प्रशासनाची चुक झाली.

मा.आयुक्त :त्यात दोष आहे ज्या पध्दतीने अटी शर्ती ठेवायला पाहिजे त्या ठेवल्या नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :तत्कालीन आयुक्त श्री. केंद्रेकर यांनी मनपाचे पैसे वाचविण्याचा प्रयत्न केला. जे करार केले त्यात एएमटी बस, रॅमकी असेल महापालिका मा.कोर्टात कुठेच जिंकु शकणार नाही असे केले. टेंक्नीकली ती एजन्सीच बरोबर नव्हती तर टेडर काढायला नको होते. अधिकारी यांनी प्रोसेसमध्ये चुक केली. नागरीकांवर भुदंड पडणार आहे. मा.सर्वोच्च न्यायालयात मनपाच्या विरोधात निकाल गेला यास अधिकारी जबाबदार आहे. समांतरचे ॲग्रीमेंन्ट सुध्दा तसेच आहे. त्यातही

मा.न्यायलायात कधीच मनपाच्या बाजूने निकाल लागणार नाही. ज्यांनी करारनामा केला त्यांचेवरही कार्यवाही व्हावी. एलईडी च्या प्रकरणात रेड ॲन्व्हेन्सीस कोर्टात आयुक्त किंवा जे संबधीत अधिकारी होते त्यांनी तात्काळ दाखल का केले नाही त्यावेळेस त्या आयुक्तांनी सही केली कशी मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाची प्रत सर्व सदस्यांना का दिली नाही त्या एजन्सीला काम दयायचे नाही तो प्रस्ताव येतो परंतु मा.कोर्टाने आदेश केले त्याची प्रत आम्हाला का दिली नाही. या एलईडी लाईटच्या प्रकरणात सुरूवातीपासून टेंडर बोलवण्यापासून प्रोसेस करण्यास भ्रष्ट्राचार करण्याचा प्रयत्न केला ज्याची चूक आहे त्याचेवर कार्यवाही व्हावी. जो भुर्दंड नागरीकावर पडणार त्याचा बदला म्हणून त्या अधिकाऱ्यांना शिक्षा व्हावी.

मा.आयुक्त :या संबंधीत जे ही अधिकारी आहे सर्व रिपोर्ट शासनाकडे पाठविणार आहे १०० टक्के कार्यवाही होणार आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :एलईडी दिवे कसे लागणार कशा पध्दतीचे काम होणार त्याचे स्वरूप कसे असणार आहे सर्व सदस्यांना माहिती दयावी.

श्री.दिलीप थोरात :एलइडी टेंडरचे ठराव रद्द करण्याची घाई केली. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेला मा.कोर्टात कन्टेम साठी कार्यवाही करावी लागली ज्यावेळेस सभेला प्रस्ताव आले त्यावेळी असे ठरले की ही बाब मा.कोर्टाच्या निदर्शनास आणून देऊ व नंतर रद्य करण्याचा ठराव घेऊ परंतु या बाबत प्रशासनाने काळजी घेतली नाही. ठराव ठेवतांना स.पदाधिकारी यांचेशी चर्चा केली नाही. समांतर रद्य करण्याचा ठराव ठेवतांनाही पदाधिकारी यांचेशी चर्चा केली नाही प्रशासनाने समन्वय ठेवून प्रस्ताव ठेवायला पाहिजे. सर्वाशी चर्चा करून प्रस्ताव घेतला असता तर जी माघार घेण्याची वेळ आली नसती.

श्री.नंदकुमार घोडेले :२.२५ कोटी एजन्सीला दरमहा कसे देणार आहे.

श्री.भगवान घडमोडे :कशा पध्दतीने काम करून घेणार आहे.

श्री.गजानन बारवाल :प्रस्ताव मंजूर केला कोर्टात कन्टेम झाले पुढे काय होणार आम्हाला माहिती दिली नाही. काय काय प्रोसेस झाली न्यायालयाचे काय आदेश आहे माहिती दयावी.

मा.महापौर :मा.न्यायालयाने आदेश दिले आहे यावर चर्चा न होता पुढील काय निर्णय घ्यायचे ते घेऊ शहराच्या हिताचे निर्णय घेत असतो. जे निर्णय होतात त्याची माहिती दिली पाहिजे. जी बी समोर जेंव्हा प्रस्ताव आला पैसे बचत होतील सांगितले जे ही करार होतात तपासणी करून घ्यायला पाहिजे.जेंव्हा कोर्ट प्रकरण होते तेथे महापालिका कमी पडतो मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश काय झाले माहिती दिली नाही.प्रशासनाने समन्वय ठेवून काम करावे.यापुढे असे होऊ नये.

श्री.राजू शिंदे :पाणीपट्टी वसुलीसाठी मनपाने स्वतंत्र खाते ओपन केले आहे काय असे खाते ओपन करता येते का ?

मा.आयुक्त :समांतर बाबत निर्णय घेतला त्यानंतर नागरीकांनी पैसे भरण्यास बंद केले आहे. स्वतंत्र खाते ओपन केले आहे करारनामा नुसार खाते ओपन करू शकत नाही काही इश्यूव्ह होऊ नये त्यामूळे खाते ओपन केले.

श्री.राजू शिंदे :या एका गोष्टीमूळे महापालिकेच्या विरोधात मा.न्यायालयाचा निर्णय होणार आहे यामुळे कराराचा भंग होणार आहे.

मा.आयुक्त :मागिल वर्षी ५६ कोटी जमा झाले होते. कोर्ट प्रकरण जास्त दिवस चालले तर नागरीक पैसेही भरणार नाही उत्पन्न येणार नाही विकास कामासाठी पैसा लागतो हे विचारात घेतले आहे.

श्री.राजू शिंदे :कराराचा भंग करतो आहे. यामूळे मनपाच्या विरोधात निकाल जाणार आहे.एजन्सीच्या नावावर पैसे जाणार नाही याची दखल घ्यावी.

मा.महापौर :कराराचा भंग होणार नाही याची दखल. मा.आयुक्तानी तपासणी करून घ्यावी.

श्रीमती माधुरी देशमुख :जे योग्य राहिल असा करार करायला पाहिजे. महापालिका स्वतंत्र खाते ओपन करू शकणार नाही असेही करारात नाही. करार करतो विधी विभागाचा सल्ला घेतो का? एलईडी लाईटचा करार केला विधी विभागाचा सल्ला घेतला होता काय?

श्री.दिलीप थोरात :लाईटचे देखभाल दुरूस्तीचा ठेका संपलेला आहे. पुढील काम कसे करणार आहे.

मा.आयुक्त :लाईट सिस्टम हे पुढच्यासाठी असणार कामास सुरूवात होत नाही तोपर्यत मनपाच काम करेल.

मा.महापौर :लाईटची कामे कसे व कुणाकडून करून घ्यायचे प्रशासनाने योग्य कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :पथदिवे बसविण्यासाठी निविदा काढली एलईडी मुळे थांबले होते.

मा.उपमहापौर :१०० टक्के काम करून घेणार २०० टक्के काम करील कारण १००० चे काम केले तर ८०० चे नुकसान मनपाचे होते. मनपाची आर्थीक परीस्थिती खराब आहे एखादयाने कामच सुरू केले नाही तो कन्टेम करेल नुकसान भरपाई मागेल. तो खर्च करील त्यापेक्षा २ पट खर्च वसुल करणार आहे इतका मोठा खर्च करणार आहोत तो खर्च वाचविण्याच्या दृष्टीने काही करू शकत असाल तर ते करावे. सभागृह मदत करील. कोणते काम करणे महत्वाचे आहे प्रशासनाने प्राधान्याने घ्यावे त्याप्रमाणे शहरातील कामे करावी.

प्रश्न क्रमांक ६२५ :स.श्री.इरशाद खान

श्री.ईरशाद खान :उत्तर दिले ते योग्य नाही.

मा.महापौर :संबधीत अधिकारी नाही.

प्रश्न क्रमांक ६२७ :स.श्रीमती सरवत बेगम

श्रीमती सरवत बेगम :काम केंव्हा करणार आहे.

कार्य.अभियंता :डिझाईनसाठी कोटेशन मागवले आहे जास्तीचे आलेले होते पुन्हा मागविले आहे.

श्री.फेरोज खान :टेंडर होऊन ७ वर्ष झाले एवढा उशीर का लागतो.

मा.आयुक्त :या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

| | |
|---|---|
| प्रश्न क्रमांक ६२८ | : |
| श्रीमती सरवत बेगम | :पाणी देणे साठी काय नियोजन केले. |
| उपअभियंता | :एक दिवसा आड पाणी देऊ शकत नाही.समांतर लाईनचे काम होत नाही तोपर्यत पाणी देऊ शकत नाही. |
| श्री.गजानन बारवाल | :नियोजन नाही दररोज पाणी देऊ शकतो. |
| प्रश्न क्रमांक ६२९ | :श्रीमती माधुरी देशमुख |
| श्रीमती माधुरी देशमुख | :प्रश्न दिला होता वार्डात फवारणी होत नाही.नागरीक आजारी पडतात. साधन सामुग्री असतांना फावारणी का होत नाही २४३ कर्मचारी आहे आठ दिवसात फवारणी होत नाही. फवारणी यंत्र १०० असल्याचे सांगतात. प्रत्येक वार्डात एक यंत्र दिले तरी दररोज फवारणी होऊ शकते.फॉगींग मधीन २५ आहे १२ चालू १३ नादुरूस्त आहे त्या मशीनची किमंत कीती  त्या कधीपासून नादुरूस्त आहे. |
| मलेरीया प्रमुख | :मी चार्ज घेतला तेंव्हापासून फॉगींग मशीन १३ नादुरूस्त आहे. दुरूस्तीसाठी पाठपुरावा चालू आहे. येत्या आठवडयात दुरूस्त होतील. ५० हजार किंमत असू शकते दुरूस्तीसाठी ३९ हजार लागेल. |
| श्री.फेरोज खान | :बुढीलेन भागात ०२ डेंग्युचे रूग्णघाटीत ॲडमीट आहे माझ्या वार्डात एक रूग्ण आहे. फवारणी होत नाही स्वछतेकडे लक्ष देण्याची गरज आहे.साफसफाई होत नाही. |
| श्रीमती माधुरी देशमुख | :कर्मचारयावर वेगळा खर्च, औषधावर ८-१० लक्ष महिना खर्च होतात असे दिले.त्याप्रमाणे फवारणी होत नाही. मा.आयुक्तांनी या विभागाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ३१ आरोग्य केंद्र आहे डॉक्टर व इतर चारशे कर्मचारी आहे त्यांना इतर कामासाठी घेण्यात यावे आशा वर्कर आहे त्यांना काम दयावे.जलतरण तलावावरील कर्मचारी इतर कामासाठी घ्यावे. दिरंगाई करणाऱ्यावर काय कार्यवाही करता येईल ते पहावे. |
| श्री.भगवान घडमोडे | :फवारणी होत नाही अनेक आजार होत आहे २४३ कर्मचारी फवारणीचे काम करू शकत नाही का? |
| आरोग्य वैद्य.अधिकारी | :फवारणीसाठी ८६ कर्मचारीच आहे.प्रत्येक वार्डात मोहिम राबविली होती.आता विभाग माझ्या कडे नाही. टीमवर्क करून पुन्हा मोहिम राबविली जाईल. |
| श्री.भगवान घडमोडे | :१०० पंप १२ फॉगींग मशीन व ८६ कर्मचारी दयावे फवारणीचे काम होऊ शकते. |
| मा.आयुक्त | :कोणत्या दिवशी कोणत्या वार्डात फवारणीसाठी कोणते कर्मचारी येणार सर्वांना त्याची प्रत दिली जाईल. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :महानुभव आश्रम मध्ये सैन्यासी राहतात ५ लोकांना डेग्यु झाला ॲडमीट आहे.देवळाई सातांरा परीसरातही डेग्युचे रूग्ण आहे. प्रशासनाने दखल घ्यावी. |
| श्री.दिलीप थोरात | :फवारणी केल्यानंतर त्यांचा परीणाम व्हावा. |
| श्रीमती किर्ती शिंदे | :सर्व यंत्र सामुग्री खरेदी करावी प्रत्येक आरोग्य केंद्रात किती औषधीचा स्टॉक आहे किती खरेदी केली माहिती  फलकावर लावावी. |
| मा.महापौर | :आरोग्य विभागाने फवारणी बाबत कार्यवाही करावी. |

प्रश्न क्रमांक ६३२ :

श्रीमती माधुरी देशमुख :मी प्रश्न दिला होता एप्रिल २०१५ पासून आजपर्यत किती सभा झाल्या किती ठराव झाले ठरावावर काय अमलबजावणी केली.माहिती अर्धवट दिली.

मा.महापौर :हा प्रश्न पुढील सभेत घेण्यात येईल. आता विषय पत्रिका घेण्यात येते. विषय क्रमांक ५८० ते ६०४ हे स.सदस्यांचे लेखाशिर्षक बदलाचे व इतर विषय आहेत. ते मंजुर, ऐनवेळचे प्रशासनाचे व इतर विषय आहेत तेही विषय मंजुर. विषय क्रमांक-५७५ ते ५७९ प्रशासनाचे विषय आहेत, ते नंतर घेऊ. आता सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दु.२.२५ वाजता पुन्हा सभा ३.१५ वाजता सुरू)

या वेळी मा.उपमहापौर श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड हे पिठासीन अधिकारी म्हणून कामकाज चालवितात.

**विषय क्रमांक ५७५:-** **(शहर अभियंता)** महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

श्रीमती मनीषा लोंखडे :माझ्या वार्डात वैयक्तिक शौचालयाचा लाभार्थींना लाभ मिळाले नाही.

मा.आयुक्त :लाभार्थी असेल तर १०० टक्के लाभा मिळेल.

कार्य.अभियंता(श्री.झनझन) पाहणी केली तेथे शौचालय होते त्यामूळे तेथील लोक अपात्र ठरलेले आहे.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांचेकडे स.सदस्य यांनी जे लाभार्थी असेल त्यांची नावे दयावी त्या लाभार्थींना लाभ मिळेल अशी कार्यवाही करावी.विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याबाबतचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५७६:-** **(कार्यकारी अभियंता, जलनि:स्सारण प्रकल्प)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर हे ऐतिहासीक शहर असून येथे पर्यटक, नागरीक, अभ्यागत तसेच येथील शैक्षणिक वातावरण पुरेसे पोषक आहे. त्यामुळे येथे लगतच्या जिल्ह्यांमधून विद्यार्थी अभ्यासक मोठ्या प्रमाणावर येत असतात, या शिवाय येथे मौलाना आझाद संशोधन केंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र असल्याने व संशोधनाची पुरेशी सोय असल्याने येथे देशातील/परदेशातील संशोधक विद्यार्थी येत आहे. मात्र तेथे शहरात शौचालयाची पुरेशी सोय नसल्याने येथे येणाऱ्या नागरिकांची/पर्यटक विशेषत: महिला वर्गाची गैरसोय होते. शहराचा व्याप वाढत असल्याने येथे विविध गर्दीच्या ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची सुविधा असणे आवश्यक आहे. तथापी, औरंगाबाद शहरात काही तुरळक ठिकाणचे “पे ॲण्ड युज” शौचालय वगळता शौचालयाची संख्या पुरेशी नाही. सद्यस्थितीत भारत सरकारकडून स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत असून या कार्यक्रमा अंतर्गत देशातील विविध शहरामध्ये वैयक्तिक तसेच सार्वजनिक शौचालय बांधण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. मा.पंतप्रधान यांचा भारत वर्ष हागणदारी मुक्त करण्याचा फ्लॅगशिप कार्यक्रम आहे. त्यामुळे औरंगाबाद शहर हागणदारीमुक्त करण्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेतला आहे.

आतापर्यंत औरंगाबाद शहरात विविध गर्दीच्या ठिकाणी स्वत:च्या आर्थिक तरतुदी मधून १६ ठिकाणी “पे ॲण्ड युज” शौचालय बांधली असून, ५ ठिकाणी बी.ओ.टी. तत्वावर शौचालय बांधण्यात आलेली आहेत. वरील नमुद सर्व शौचालय आजमितीस कार्यरत आहेत. तथापी, सदर शौचालये शहराचा विकास व आवाका पाहता अशा शौचालयाची संख्या अपूरी पडत आहे. त्यामुळे सदर बाबत

विचारात घेऊन शहरामध्ये यापुढे उपलब्ध होणाऱ्या विविध शासकीय/निमशासकीय किंवा विना मोबदल्याने महानगरपालिकेस हस्तांतरीत होणाऱ्या खाजगी जागेत “पे ॲण्ड युज” शौचालय बांधण्याचे महानगरपालिकेने निश्चित केले आहे.

तसेच, जनहित याचिका क्रमांक ९८/२०११ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशा नुसार शहरामध्ये विविध गर्दीच्या ठिकाणी महिलांसाठी शौचालये बांधणेची कार्यवाही करणे बाबत आदेशीत केले आहे. या अनुषंगाने महानगरपालिकेने काही आवश्यक ठिकाणी केवळ महिलांसाठी स्वतंत्र शौचालये बांधण्याचे निश्चित केले आहे. यासाठी महानगरपालिकेने आवाहन केले असता शहरातील प्रतिष्ठीत नागरीक, सामाजिक संस्था (NGO), उद्योगपती पुढे येत असून त्या “पे ॲण्ड युज” पध्दतीवर चालविले जाणारे शौचालय त्यांच्या खर्चाने बांधून देण्यास तयार आहेत. अशा प्रकारची शौचालये बांधल्या नंतर ते या शौचालयाचे परिचालन पुढील ३० वर्ष करणार आहे. या मध्ये शौचालय देखभाल दुरुस्तीचा खर्च विद्युत देयकाचा खर्च व पाणी कराचा खर्च संबंधीत संस्था करण्यास तयार आहेत. यामध्ये सदरील संस्थानी जागेच्या आवश्यकते नुसार प्रि-फॅब्रीकेटेड/मेटल बॉडी/पी.व्ही.सी. हेवी शिट अथवा बांधकामामध्ये शौचालय बांधण्याचा समावेश करणे बाबत या कार्यालयास विनंती केली आहे.

तरी उक्त स्वरुपाने यापूढेही ज्या ज्या संस्था अशा प्रकारे सामाजिक बांधीलकीच्या जाणीवेतून (सी.एस.आर.) बांधून देण्यास तयार असतील त्यांना कार्यालयातर्फे जागा उपलब्ध करून देणे, त्यांच्या समवेत आवश्यक अटी व शर्तीवर करार करणे व इतर अनुषंगीक कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

श्री.राजेंद्र जंजाळ :अशा कामासाठी जागा निश्चित करीत असतांना त्या वार्डाचे सदस्य यांना विश्वासात घ्यावे.व सभागृहासमोर तसा प्रस्ताव आणावा.

श्रीमती माधुरी देशमुख :हे स्वच्छता गृह कोण बांधणार आहे नावे यावी यापुर्वी कुणी बांधले पुंडलिकनगर येथे शौचालय योगीराज कॉम्प्लेक्स लागून बांधले ते बांधतांना नॉम्स असतात. समोरच्या बाजूला पाच फुट सरकून रॅलींग टाकले लोक रस्त्यावर गाडया लावतात.ते रॅलींग काढावे. समोरुनच आत मध्ये जाण्यास प्रवेशद्वार आहे. दखल घ्यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :शौचालयाच्या नावाखाली इतर व्यवसाय तेथे चालतात ते बंद करावे फक्त तेथील जागेचा वापर हा शौचालयासाठी असावा असे अटी शर्ती करतांना टाकावे.

श्री.नंदकुमार घोडेले :सुलभ इंटरनॅशनल संस्थेला शौचालय बांधण्याचे काम दयावे महापालिकेला खर्च येत नाही शासन या संस्थेला अनुदान देत असते त्यांना जागा व कुठे दयायची ते निश्चित करून दयावे लागते.

मा.महापौर :जागा निश्चित करून सभागृहासमोर मान्यतेसाठी सादर करावे.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरामध्ये विविध गर्दीच्या ठिकाणी महिलांसाठी शौचालये बांधण्या करीता शहरातील प्रतिष्ठीत नागरीक, सामाजिक संस्था (NGO), उद्योगपती पुढे येत असून त्या “पे ॲण्ड युज” पध्दतीवर चालविले जाणारे शौचालय त्यांच्या खर्चाने बांधून देण्यास तयार असुन अशा प्रकारची शौचालये बांधल्या नंतर ते या शौचालयाचे परिचालन पुढील ३० वर्ष करणार आहे. या मध्ये शौचालय देखभाल दुरुस्तीचा खर्च विद्युत देयकाचा खर्च व पाणी कराचा खर्च संबंधीत

संस्था करण्यास तयार असल्याने यामध्ये सदरील संस्थानी जागेच्या आवश्यकते नुसार प्रि-फॅब्रीकेटेड/मेटल बॉडी/पी.व्ही.सी. हेवी शिट अथवा बांधकामामध्ये शौचालय बांधण्याचा समावेश करणे बाबत या कार्यालयास विनंती केल्यानुसार ज्या संस्था अशा प्रकारे सामाजिक बांधीलकीच्या जाणीवेतून (सी.एस.आर.) बांधून देण्यास तयार असतील त्यांना कार्यालयातर्फे जागा उपलब्ध करून देणे, त्यांच्या समवेत आवश्यक अटी व शर्तीवर करार करणे व इतर अनुषंगीक कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास तसेच जागा निश्चितीकरण केल्यानंतर या सर्वसाधारण सभेपूढे सादर करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५७७:-** **(आरोग्य विभाग)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, नागरी हिवताप योजने अंतर्गत डेंग्यु, मलेरिया सारखे साथीच्या रोगांवर आळा घालण्यासाठी महानगरपालिका हद्दीतील ७२ लहान व मोठे नाले, भुमिगत गटारी, पाण्याचे डबके तसेच नव्याने महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेले देवळाई, सातारा परिसर, गुंठेवारी भागातील लहान मोठे गड्डे येथील डास उत्पत्ती ठिकाणांवर लहान फवारणी पंप व मनुष्यबळाने अळीनाशके फवारणी करणे शक्य नसुन यासाठी फिरते फवारणी यंत्राद्वारे फवारणी करणे आवश्यक आहे. महानगरपालिका हद्दीतील नऊ प्रशासकीय वॉर्डातील लहान व मोठे नाले, भुमिगत गटारी, पाण्याचे डबके, नव्याने महानगरपालिका हद्दीतील समाविष्ट झालेले देवळाई सातारा परिसर, गुंठेवारी भागातील लहान मोठे गड्डे अळीनाशके फवारणी करण्याकरीता यंत्र व औषधी तीन खाजगी तत्वावर करण्यास तत्वता: प्रशासनाची सहमती असल्याने यासाठी वार्षिक खर्च र.रु.५०,१६,४९२/- अपेक्षित असून मनपा अर्थसंकल्पात तीन फिरते फवारणी यंत्राकरीता रक्कम रुपये ६० लाख (साठ लाख) आर्थिक तरतुद करण्याकरीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

श्री.भगवान घडमोडे :नेमके काय कार्यवाही करणार आहे.

आरोग्य वैद्य. अधिकारी :फवारणी ट्रॅक्टर चा प्रस्ताव आहे.या मशीनरीने नाल्याच्या भागात फवारणी करावी लागते.वार्षीक भाडे,लागणारे यंत्र व औषध मनुष्यबळ याचा वार्षीक येणारा खर्च काढलेला आहे ५० लक्षच्या पुढे आहे.हे अंदाजपत्रक आहे यानंतर ई टेंडरींग करून तीन ट्रॅक्टर भाडयाने घ्यायचे आहे.सध्या तीन ट्रक्टर चालू आहे २२०० रूपये प्रति ट्रक्टर दिवसाला भाडे देतो.

श्री.राजगौरव वानखेडे :मागिल केंव्हापासून टेंडर झाले नाही.झाले नसेल तर का झाले नाही.

आरोग्य वैद्य. अधिकारी :मागिल २०१४ मध्ये टेंडर केले होते २०१५ मध्ये केले नाही आता पुन्हा होत आहे.मध्ये आचारसंहिता व इतर कारणे प्रत्येक वेळेस होते. दोन वेळेस टेंडर केले सक्सेस झाले नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :चार वर्षापासून मुदत देत आलो स्थायी समितीची मान्यता घेतली नाही.२२००रू प्रमाणे दररोज तीन ट्रक्टरचे रू.६६००/- होतात. एवढा खर्च होऊन सुध्दा समाधानकारक फवारणी होत नाही. मुदतवाढ घेतली नाही त्यावेळी कोणते अधिकारी होते.

आरोग्य वैद्य.अधिकारी :डॉ.कुलकर्णी यांचेकडे त्यावेळी चार्ज होता

श्री.भगवान घडमोडे :बोगस बिले उचलतात फवारणी होत नाही टेंडर का झाले नाही.

आरोग्य वैद्य. अधि. :ज्यांनी काम केले त्यांना पेमेंन्ट दिले नाही.

मा.आयुक्त :टेंडर का झाले नाही सभेची मान्यता का घेतली नाही. चुक कुणाची आहे चौकशी होईल.

श्री.राजगौरव वानखेडे :ट्रॅक्टर विकत घ्यावे भाडेने घेऊ नये.फॉगींग मशीन घेतले पंप घेतले होते ते कुठे आहे.

आरोग्य वैद्य.अधिकारी :सर्व पंप आहे २५ पंप आऊट सोर्सींगचे काम दिले त्यासाठी आहे.सर्व कर्मचारी यांना पंप दिले आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :फवारणी यंत्र पाहिजे तरतुद कशी करायची तसे प्रशासनाला आदेशीत करावे. आऊट सोसींग असेल भाडेने घ्यायचे असेल किंवा खरेदी करायचे असेल प्रशासनाला जे योग्य वाटेल त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.फवारणी आवश्यक आहे.

आरोग्य वैद्य. अधिकारी :तरतुद ६० लक्षची आहे फवारणी ट्रॅक्टरचा प्रस्ताव आहे पंपाचा विषय वेगळा आहे १०००-१२०० मध्ये एक पंप येतो.ते खरेदी केले होते ते उपलब्ध आहे

श्रीमती माधुरी देशमुख :७७ वाहन आहे चालक तेवढेच असेल ट्रॅक्टर व इतर वाहने किती ते येथे वापरात येतील का जी यंत्रणा आहे ते वापरात घ्यावे.यांत्रिकी विभागात अनेक वाहन उभे दिसतात.

श्री.भगवान घडमोडे :तरतुद करण्यास विरोध नाही खाजगी तत्वावर करू नये ते एजन्सी काम करीत नाही.मागच्या कामाची चौकशी करावी २५ लक्ष भाडेपोटी दिले जाते ५ लक्ष मध्ये एक ट्रक्टर येते याचा विचार करावा.

मा.महापौर :मागिल दोन वर्षापासून टेंडर का झाले नाही. चौकशी करावी टेंडर न होता पैसे कसे दिले फवारणी झाली का पैसे देतांना सर्व बाबी तपासल्या का नाही.या बाबत स्थायी समिती व सर्वसाधारण सभेला का कळविले नाही. सभेला अधांरात ठेवले आहे दोषीवर कार्यवाही करावी. या प्रस्तावानुसार महापालिकेला स्वत:चे वाहन खरेदी करता येत असेल तर तशी कार्यवाही करावी कमीत कमी खर्चात कसे करता येईल त्या पध्दतीने प्रशासनाने सर्व माहिती घेऊन कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दीतील नऊ प्रशासकीय वॉर्डातील लहान व मोठे नाले,भुमिगत गटारी, पाण्याचे डबके, नव्याने महानगरपालिका हद्दीतील समाविष्ट झालेले देवळाई सातारा परिसर, गुंठेवारी भागातील लहान मोठे गड्डे अळीनाशके फवारणी करण्याकरीता अर्थसंकल्पात साठ लक्षची आर्थिक तरतुदीस मान्यता देण्यात येते. तसेच फिरते फवारणी यंत्राद्वारे यंत्र व औषधी तीन खाजगी तत्वावर करण्यास मान्यता देण्यात येते. मागिल दोन वर्षापासून टेंडर का झाले नाही? टेंडर न होता पैसे कसे दिले? फवारणी झाली का? पैसे देतांना सर्व बाबी तपासल्या का? याबाबत स्थायी समिती व सर्वसाधारण सभेला कळविले होते का? या सर्व बाबींची चौकशी करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५७८:-** **(घनकचरा व्यवस्थापन कक्ष)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.विभागीय आयुक्त कार्यालय सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र जाक्र/२०१६/साप्र/कक्ष-१/पोल-१/कावि दिनांक १४.०१.२०१६ तसेच मा.जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपालिका प्रशासन विभाग यांचे पत्र जाक्र/२०१६/नपाप्र/कावि/१२९ दिनांक २८.१.२०१६ अन्वये नारेगाव कचरा डेपो येथे कचरा टाकणेसंदर्भात मा.न्यायालयाचा मनाई हुकूम असून महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाने देखील नारेगाव कचरा डेपो येथे कचरा टाकणेसंदर्भात मनाई दर्शविली आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे वर्गीकरण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासाठी ओला कचरा स्वतंत्रपणे गोळा करून डंप केल्यानंतर कंपोस्ट खत तयार करण्यासाठी तसेच सुका कचऱ्याचे वर्गीकरण (प्लास्टिक, कागद, थर्माकोल इ.) करण्यासाठी शेड बांधणे आवश्यक आहे.

नियमानुसार आवश्यक ती रक्कम जमा करण्यात येऊन कराराची व कागदपत्रांची पुर्तता करण्यात येईल. शासकीय जमीन उपलब्ध झाल्यास खालीलप्रमाणे दिर्घ मुदतीच्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.

(१) प्लास्टिक प्रोसेसिंग प्लॅन्ट
(२) सी ॲण्ड डी प्लॅन्ट
(३) बायोकंपोस्ट प्लॅन्ट
(४) सॅनेटरी नॅपकिन प्लॅन्ट
(५) कचऱ्यापासुन वीज निर्मिती प्रकल्प
(६) कचऱ्यापासून गॅस निर्मिती प्रकल्प
(७) कचऱ्यापासून बायो मिथेनायजेशन प्रकल्प

| अ क्र | गाव | गट क्रमांक | क्षेत्रफळ (हे.आर) | रस्ता | अंतर | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तीसगाव | २२७ | ८७ | नाशिक रोड | औरंगाबाद बसस्थानकापासून १२ कि.मी. | १.२१ हेक्टर गावठाण व इतर खदानी व डोंगर |
| २ | सावंगी | ४२ | २६.४९ | | हर्सुलपासून ६ कि.मी. | |
| | | ५५ | ४३.७४ | | | |
| | | १२० | २९.९८ | | | |
| ३ | आडगाव बु. | १४६ | ३४.१७ | सावंगी रोड | चिकलठाण्यापासून ७ कि.मी. | डोंगरभाग व खदानी |
| | | १७९ | ३७.४७ | | | |
| | | | **पैठण तालुका** | | | |
| ४ | खांडेवाडी/ नायगव्हाण | ७ | ७.८५ | औरंगाबाद पैठण रोडच्या पश्चिमेस | नक्षत्रवाडी पासून २ कि.मी. | खदानी व अतिक्रमण |

करीता, उपरोक्त ठिकाणी शासकीय जमीन मिळण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

श्री.गजानन बारवाल : शासकीय जमिन घेण्याचा प्रस्ताव आहे.नारेगावचा प्रकल्पास अडचणी येत आहे.या जागा घ्यायचा तेथील लोकांनी ऑलरेडी विरोध दाखल केला आहे.हया जागा मिळू शकते का माहिती दयावी.

श्री.नंदकुमार घोडेले : करोडीला जागा अंतिम केली होती लोकांनी विरोध केला तोच प्रकार तीसगाव पळसीला झाला.सरकार जमीन देईल नागरीकाच्या हिताचा आरोग्याचा विषय आहे परंतु ग्रामपंचायतीची एनओसी घेतल्याशिवाय कार्यवाही होऊ नये.

श्री.राजू शिंदे : या ठिकाणी डंपीग ग्रांऊड करणार की कचरा प्रोसीसींग करणार आहे प्लॅन्ट करावा लागणार दररोजचा कचरा विल्हेवाट लावली तर जागा देतील.हे करण्यासाठी तरतूद कशी व नियोजन कसे असणार आहे.दररोजच्या येणा-या

कच-यावर प्रोसेसींग करणार आहे असे नागरीकांना सांगितले तर विरोध होणार नाही.शहराच्या ४-५ भागात हे चालू करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :काही संस्था कंपनी स्वत:च्या जागेत असे युनीट उभारण्यास तयार आहे तसे पेपरच्या माध्यमातून देऊन कार्यवाही करावी.जागेसहीत ते युनीट करण्यास तयार आहे.

श्री.राजू शिंदे :शेंद्रा भागात ५ एकर जागेवर करण्याचे नियोजन होते काय झाले तसेच डीएमआयसी भागात ही कचरा प्रक्रिया करण्यास जागा मिळू शकते.काही कंपनी कचरा उचलून नेण्यास तयार आहे.मनपाची एनओसी फक्त त्यांना पाहिजे.

मा.आयुक्त :१० मॅट्रीक टन कचरा घेणेसाठी एक कंपनी तयार आहे एमआयडीसी भागात ते करणार आहे मनपा हद्दीत नाही फक्त कचरा देणार आहे.हा प्रस्तावनुसार वेस्ट टु एनर्जी कन्व्हर्सन प्रोसेसींग प्लॅन्ट असे प्रपोजल आहे २ महिण्यापुर्वी युडी सेक्रेटरी व इतर अधिकारी व मी पण त्यांचेबरोबर जबलपुरला गेलेलो होतो प्रोसेस असे की त्यामध्ये १० एकर जागा दयायची आहे जागा मनपाची व प्रोसेसींग प्लॅन्ट ते उभे करणार आहे शासन या संदर्भात मार्गदर्शन देणार आहे जो प्लॅन्टसाठीचा लाईटचा जो खर्च असेल तो शासन व विदयुत विभाग मिळून अॅग्रीमेन्ट असणार त्याप्रमाणे देतील मनपास फक्त जागा उपलब्ध करून दयायची आहे. या जागा ग्रामपंचायतीच्या आहे त्यांची एनओसी घ्यावी लागेल.सिम्पल मायक्रो प्लॅन्ट करता येईल का ते ऑपशन ठेवले हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर पुढील प्रोसेससाठी पाठवावा लागेल.जर या नुसार सक्सेस झाले नाही तर दुसरा पर्याय असा की शहराच्या बाजूला काही भागात जागा आहे. तेथे प्लॅन्ट उभारले तर ग्रामपंचायतीकडे जाण्याची गरज राहणार नाही

श्री.राजेंद्र जंजाळ :असा प्लॅन्ट आजपर्यत महाराष्ट्रात कुठेस सक्सेस झाला नाही.यापुर्वी अनेकदा यावर चर्चा झाली. राष्ट्रीय स्तरावरील पेपरला जाहीर प्रगटन देऊन जे कंपनी इन्ट्रेस्टेड आहे ते काम करतील.मुळ मुद्दा हाच की कुठल्यातरी शास्त्रीय पध्दतीने या कच-यांचे विघटन झाले पाहिजे.कचरा डंपीग करणे पर्याय असू शकत नाही.यावर चर्चा करून निर्णय घ्यावा.एक यंत्र असे की ते कचरा डिस्पोज करते.विज मिळत नाही खत मिळत नाही ते बघुन घ्यावे.हा ठराव मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री.राजू शिंदे :कचरा डेपो म्हटल्यानंतर कुणीच परवानगी देणार नाही केंद्र शासन राज्य शासनाच्या गाईड लाईन्स् आहे त्याचा डेमो दिला व शास्त्रोक्त पध्दतीने केले तर जनता तयार होईल.एकही दिवसाचा कचरा डंपीग होणार नाही. खत निर्मिती विज निर्मिती करणार हे सर्व पेपरच्या माध्यमातून जनतेला कळवावे.काही कंपनी कचरा घेण्यास तयार आहे फक्त त्यांना जागा दयावी लागेल.सवीस्तर माहिती दयावी नसता मंजूर होणार लोकांचे मोर्चे अंदोलन येतील.

मा.आयुक्त :मनपास जागा दयायची आहे हा प्रोसेसींग प्लॅन्ट वेस्ट एनर्जी कन्व्हर्शन प्लॅन्ट आहे कचरा देणार आहे कचरापासून ते विज निर्मिती करणार आहे. अर्बन डेव्हलपमेंन्ट विभागाकडून त्या बाबतीत गाईड लाईन्स् येणार आहे जागा फिक्स करून ठेवू. त्यानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

श्री.नंदकुमार घोडेले :ग्रामपंचायतीची एनओसी आल्यानंतर कार्यवाही करावी ऑफ्शन ठेवा की जर जागेसहीत कुणी प्लॅन्ट करण्यास तयार असेल तर ते करावे डीएमआयसी मध्ये जागा उपलब्ध होऊ शकते ते पण ऑप्शन ठेवावे.दुरूस्तीसह मंजूर करावे.

कार्य.अभियंता :वेस्ट-टु-एनर्जी यास मनपाने प्राधान्य दिले आहे. काम्पोजेशन व इतर टेक्नॉलॉजी आहेत. वेगवेगळे प्रोसेस युनीट पाहिले आहे.देशात जे टॅक्नॉलॉजी चालू आहे त्यावर अभ्यास करणार व वेस्ट एनर्जी मधे जागा कमी लागते.काही एजन्सी पाच एकर मध्ये काम करण्यास तयार आहे.कचरयावर प्रोसेसींग होणार विज निर्मिती होणार त्याचे रेटस् काय मिळणार ता मुद्दा होता प्रोसेस युनीट साठी जागा पाहिजे ग्रामपंचायतीची एनओसी आवश्यक आहे.

श्री.राजू शिंदे :प्लॅनींग करावे त्यानंतर हे करावे जनतेला सर्व माहिती दयावी.

श्री.भगवान घडमोडे :विषय मंजूर करावा शास्त्रोक्त पध्दतीने कचरयाची विल्लेवाट कशी लावता येईल ते यात करावे. अनेक कपंनी काम करण्यास तयार आहे संपर्क करून कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :कचऱ्याची विल्हेवाट ही शास्त्रोक्त पध्दतीने लावावी त्यानुसार मंजूर करावे.

मा.महापौर :प्रोसेस युनीट साठी जागा दयायची आहे.संबधीत गावाची एनओसी घेतल्यानंतर कार्यवाही करावी. सर्व नागरीकांना प्रोसेस युनीट कशाचे करणार आहे कशा पध्दतीने काम चालणार आहे सर्व माहिती दयावी व सदस्यांना ही माहिती दयावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.विभागीय आयुक्त व नगरपालिका प्रशासन विभाग यांचे पत्र तसेच नारेगाव कचरा डेपो येथे कचरा टाकणे संदर्भात मा.न्यायालयाचा मनाई हुकूम दर्शविलेला असल्याने तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे वर्गीकरणासाठी ओला कचरा स्वतंत्रपणे गोळा करून डंप केल्यानंतर कंपोस्ट खत तयार करण्याकरीता तसेच सुका कचऱ्याचे वर्गीकरण (प्लास्टिक, कागद, थर्माकोल इ.) करण्यासाठी शेड बांधणे करीता नियमानुसार आवश्यक ती रक्कम जमा करण्यात येऊन कराराची व कागदपत्रांची पुर्तता करण्यास तसेच याकरीता प्रस्तावातील नमुद केलेल्या गाव-तीसगाव, सावंगी, आडगाव बु., खांडेवाडी/नायगव्हान येथील गट नं. व दर्शविलेल्या जागेचा क्षेत्र फळानुसार जमीन उपलब्ध करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच संबंधीत ग्रामपंचायतची एन.ओ.सी. घेतल्यानंतर पुढील ती आवश्यक कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५७९:-</u>** **(आस्थापना अधिकारी-१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १४.०९.२०१५ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत डॉ.जयश्री कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याबाबत चर्चा झाल्याने, त्या दिनांक १४.०९.२०१५ पासुन आजारी रजेवर होत्या. याच दरम्यान सार्वजनिक आरोग्य विभागाचे आदेश क्र. बदली-१३१५/प्र.क्र.२४६/(१२)/सेवा-२, दिनांक ३०.०९.२०१५ नुसार डॉ.सुहास जगताप, वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, मुर्तीजापूर, जि.अकोला यांची महानगरपालिकेत आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने बदली करण्यात आलेली आहे. त्यानुसार

डॉ.सुहास जगताप, वैद्यकीय अधिक्षक यांना महानगरपालिकेत रुजु केलेले आहे. डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी या संदर्भात मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१००७८/२०१५ दाखल केली. मा.उच्च न्यायालयाने प्रकरण निकाली काढले असून पदोन्नतीबाबत कुठलेही निर्देश दिलेले नाहीत. सदर याचिका निकाली काढतांना अंतिमत: प्रतिवादी क्र.१ ते ३ महापालिकेतर्फे आयुक्त, मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग आणि मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी आरोग्य वैद्यकीय अधिकारी म्हणून कोण असेल या संदर्भात निर्णय घेण्यासंदर्भात निर्देशित केलेले आहे. त्यानुसार तत्कालीन आयुक्तांनी दि.३१.१२.२०१५ रोजी आपल्या अभिप्रायासह शासनास प्रकरणात निर्णय घेणे बाबत अहवाल सादर केला आहे. परंतु शासनाकडून निर्णय/मार्गदर्शन प्राप्त न झाल्याने दि.०२.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्रकरणात लवकरात लवकर निर्णय देण्याबाबत शासनास विनंती करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत डॉ.जयश्री कुलकर्णी ह्या प्रतिक्षाधीन असल्यामुळे त्यांना माहे सप्टेंबर-२०१५ पासून वेतन व भत्ते अदा करणेबाबत मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ उपनियम ९ (१४)(एफ) सक्तीच्या प्रतिक्षेचा पुर्ण कालावधी कर्तव्य म्हणून नियमीत करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना आहे. तसेच डॉ.जयश्री कुलकर्णी यांची नियुक्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५(१) व (२) अन्वये झालेली आहे. त्यांची नियुक्ती प्राधिकारी महासभा आहे.

करीता नियुक्ती प्राधिकारी महासभा असल्यामुळे प्रतिक्षा कालावधी मधील माहे सप्टेंबर-२०१५ ते माहे जुलै-२०१६ पर्यंतचे वेतन व भत्ते रुपये ८,७०,४९७/- अदा करणे बाबत तसेच डॉ.सुहास जगताप यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी म्हणून व डॉ.जयश्री कुलकर्णी यांना केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी करण्यासाठी महापालिकेच्या “अभियान प्रमुख” म्हणून व आरोग्य विभागाअंतर्गत मलेरिया विभागाचे “विभाग प्रमुख” म्हणून काम करणेस कार्यादेश देणेबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

श्री.राजेंद जंजाळ :आस्थापना विभागाचा प्रस्ताव आहे खुलासा घ्यावा.

उपआयुक्त(आस्थापना) :प्रस्तावानुसार डॉ.जयश्री कुलकर्णी यांना ११ महिन्याचे पेमेन्ट, त्यांना पर्यायी ठिकाणी नियुक्ती देणे संदर्भात आहे. दिनांक १४.०९.२०१५ च्या महासभेत त्यांच्या कामकाजा संदर्भात चर्चा झाली व त्यानंतर त्या रजेवर गेल्या होत्या.

श्री.राजेंद्र जंजाळ :या सभागृहात चर्चा केली, म्हणून त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविले की, त्या आजारी रजेवर होत्या. प्रशासनाकडून स्पष्ट यायला पाहिजे होते यात आजारी रजेवर होते असे दिले.

श्री.भगवान घडमोडे :प्रस्तावात सक्तीच्या व आजारी रजेवर असे दोन्ही दिले. नेमक्या कोणत्या रजेवर होत्या?

उपआयुक्त(आस्थापना) :सक्तीच्या रजेवर पाठवण्याबाबत नियमात कुठेच तरतुद नाही. एखाद्याला रजेवर जायचे असेल, तर अर्ज घेतो, जर इच्छा नसतांना रजेवर पाठविले, तर ती सक्तीची रजा असू शकते.

श्री.राजेंद जंजाळ :यापुर्वी जे जे अधिकारी रजेवर गेले त्यांना पगार कसा दिला? अर्धा की पुर्ण की, फक्त भत्ता दिला गेला?

उपआयुक्त(आस्थापना) :कर्मचारी रजेवर गेला व रजा मंजूर झाली, तर पुर्ण पगार देतो. ते मा.आयुक्तांचे अधिकार आहेत.

श्री.राजेंद जंजाळ :त्यावेळी जे आयुक्त होते त्यांनी त्यांची रजा मंजूर केली होती का ?

उपआयुक्त(आसथापना) :१४-९-२०१५ ते ५-१०-२०१५ या कालावधीचा पगार दिला नाही तो पिरीयड वेगळा आहे. ५ तारखेला त्यांनी जॉईन करून घ्यावे म्हणून रिपोर्ट दिला. त्यावेळी डॉक्टर जगताप रूजू झाले होते तसेच मा.कोर्टाने जैसे थे ठेवावे आदेश केले.त्यामूळे त्यांना रूजू करून घेतले नाही आता डॉ.जगताप हे कार्यरत आहे.तेंव्हा पासून त्या प्रतिक्षेवर आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :वैद्यकीय रजा मेडीकल बोर्ड कडे पाठविली होती का? किती दिवसांत परत आल्या?

उपआयुक्त(आस्थापना) :३० दिवसांच्या आत असेल तर पाठवत नाही. त्या पुर्वी त्या रूजू होण्यास आल्या होत्या.

श्री.राजेंद्र जंजाळ :जो प्रस्ताव दिला त्यात लिहिले की, सर्वसाधारण सभेत चर्चा करण्यात आली होती. त्या चर्चेच्या अनुषंगाने बायोमेडीकल वेस्ट असेल किंवा त्यांचे स्वत:च्या पदवीच्या संदर्भात असेल, त्यावेळी चौकशी समिती नियुक्त केली होती, त्याचा अहवाल दिला नाही. जेंव्हा हा प्रस्ताव येतो, तेंव्हा त्या चौकशी व ठरावाचे काय झाले. ते सभेत सादर करायला पाहिजे होते. त्यानंतर प्रस्ताव आणायला पाहिजे होता.

उपआयुक्त-आस्थापना :त्यांच्या पदवीसंदर्भात जुन-२०१३ मध्ये प्रस्ताव मुंबईला त्या कॉलेजला पाठविला. जुलै २०13 ला त्यांचेकडून कन्फर्म होऊन आले की, त्यांनी घेतलेली पदवी व मार्कशिट योग्य आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :अधिकारी यांनी मला दिलेल्या पत्राची एक प्रत मा.आयुक्त यांना यापुर्वी मी दिली. डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी पदवी घेतली. एक वर्षाचा अभ्यासक्रम पुर्ण केला. त्या कालावधीची त्यांनी रजा दिली होती का ?

उपआयुक्त-आस्थापना :२००७ मध्ये त्यांना हा कोर्स करण्यास परवानगी दिली तो त्यांनी पार्ट टाईम केला की फुलटाईम केला ती माहिती नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :माझ्या माहिती प्रमाणे एक वर्षाच्या कालावधीचा पुर्ण अभ्यासक्रम आहे. पुणे महापालिकेत डुप्लीकेट प्रमाणपत्र दिल्यावर फौजदारी कार्यवाही झाली. या प्रकरणातही मी अनेकदा कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाकडे पत्रव्यवहार केले. कार्यवाही केली नाही. मागिल बैठकीत चर्चा झाली. त्यात बायोमेडीकल वेस्ट विषय असेल डॉ.कुलकर्णी यांचेकडे अंतर्गत काम करणारे अन्य अधिकारी कर्मचारी यांचेतील वाद असेल, त्यांचेमूळे कर्मचारी संपावर जाणे. डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी घेतलेली पदवी संदर्भात चौकशी करण्याचा विषय असेल ते प्रलंबीत आहे. एक वर्षाचा पदवी अभ्यासक्रम घेतला, त्या काळात त्या येथे होत्या, तर त्यांची पदवी खोटी की खरी आहे? हे पडताळून पाहणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त :डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी जी पदवी घेतली. तो कोर्स पार्ट टाईम की फुल टाईम होता? याचा आढावा घेतला जाईल. यात चुक आढळून आली तर १०० टक्के कार्यवाही करणार व एफआयआर दाखल करणार

श्री.राजेंद्र जंजाळ :पदवी घेतली ती खरी की खोटी? अहवाल जोपर्यत येत नाही तोपर्यत त्या पदावर त्यांना कसे नियुक्त करू शकतो. हेच कन्फर्म नाही की, त्यांनी

अभ्यासक्रम घेतला की नाही. ती पदवी ओरीजनल की डुप्लीकेट आहे. याची माहिती होणे आवश्यक आहे.

श्री.भगवान घडमोडे :किती दिवस आजारी होत्या? कोणत्या हॉस्पीटलमध्ये होत्या? किती दिवस आजारी असल्यानंतर प्रमाणपत्र घ्यावे लागते, तसे असेल तर ते त्यांनी घेतले आहे काय?

उपआयुक्त-आस्थांपना :२१ दिवसाची वैद्यकीय रजा होती. त्यांनी फिटनेस सर्टीफिकेटसह रूजू होणेसाठी अर्ज केलेला होता. त्यांना रूजू करून घेतले नाही. त्या तारखेला डॉ.जगताप हे रूजू होते. त्या वेटींगवर होत्या.

श्री.भगवान घडमोडे :रूजू करून घेतले नाही त्यांनी काम केले नाही तर पगार कशासाठी दिला?

उपआयुक्त-आस्थापना :त्या रूजू होण्यासाठी आल्या होत्या. त्यांना रूजू करून घेतले नाही. वेटींगवर होत्या. त्यावर त्यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली.

मा.महापौर :डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी रूजू करून घ्यावे म्हणून अर्ज दिला. त्यावेळी दुसरे अधिकारी त्या पदावर कार्यरत होते. प्रशासन म्हणून आपली जबाबदारी होती की त्यांना रूजू करून घेऊन दुसरीकडे पोस्टींग देणे.

उपआयुक्त-आस्थापना :आता त्यांना पोस्टींग दिली आहे.

मा.महापौर :आता दिली तेंव्हा का दिली नाही? प्रशासन त्यांना पगार देते, त्यांना त्यावेळीच पोस्टींग देणे ही प्रशासनाची जबाबदारी होती.

श्री.भगवान घडमोडे :प्रशासन वैद्यकीय अधिकारी यांची छळवणूक करते व सभागृहाला वेठीस धरीत आहे सभागृह त्यांचे विरोधात आहे, असा मेसेज बाहेर जातो आहे. प्रशासनाने अधिकाऱ्यांवर अन्याय केला. सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक २७४ दिनांक ०७.०१.२०१६ रोजीच्या सभेच्या निर्णयानुसार डॉ.जयश्री कुलकर्णी यांना त्या पदावर घेऊ नये असा निर्णय दिला. त्यानुसार त्यांचेवर निलंबणाची कार्यवाही केली असती, तर हा ठराव आणण्याची गरज नव्हती. ठराव मंजूर केला त्यानुसार काय कार्यवाही केली.

उपआयुक्त-आस्थापना :तोच विषय आहे. त्यांनी जी रिट याचिका दाखल केली, त्यात हा विषय होता. त्यावर मा.न्यायालयाने आदेश पारीत केले की, शासन व महापालिकेने एकत्रित निर्णय घ्यावा. शासनाकडे अहवाल पाठविला व शासनाने दिनांक १९.०८.२०१६ रोजी पत्राने कळविले की, त्यांना पगार दिला नाही त्यावर निर्णय घ्यावा.

मा.महापौर :पगार देणेसाठी प्रशासन पुढे येते तर त्या रूजू होण्यास आल्या, तेंव्हा त्यांना दुसरीकडे पोस्टींग देणे आवश्यक होते, ही प्रशासनाची जबाबदारी होती.

श्री.राजगौरव वानखेडे :पगार देणे संदर्भात निर्देश दिले. त्यांना पोस्टींग देणे संदर्भात काय निर्देश दिले.

उपआयुक्त-आस्थापना :तसा प्रस्ताव महासभेसमोर आणलेला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रस्ताव आता आणला. जेव्हा पगार दिला, त्यापुर्वी सभेसमोर यायला पाहिजे होते. जर प्रस्ताव फेटाळता तर पैसे भरपाई कुणाकडून करणार आहे.

श्री.भगवान घडमोडे :या महासभेच्या ठरावाची अंमलबजावणी का केली नाही? डॉ.नाईकवाडे यांचे ठरावावर अंमलबजावणी होते, डॉ.जयश्री कुलकर्णी यांचे ठरावा बाबत कार्यवाही

का केली नाही? एकास एक न्याय दुसऱ्याला दुसरा, प्रशासन राजकारण करते आरोपी आम्ही होतो.

उपआयुक्त-आस्थापना :शासनाकडे पाठविले होते. शासनाने असे म्हटले की, त्वरीत निर्णय घ्यावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :निर्णय हा महासभेने घ्यायचा होता. त्या अगोदरच त्यांना जॉईन केले. पगार देऊन टाकला हे योग्य नाही.

मा.आयुक्त :ठिक आहे. आपण तसा ठराव करावा. प्रशासन अंमलबजावणी करेल.

श्री.राजेंद्र जंजाळ :यापुर्वी सभागृहाने ठराव दिलेला होता. त्याची अंमलबजावणी का झाली नाही? आरोग्य वैद्यकीय अधिकारी असतांना बायोमेडीकल वेस्ट मध्ये झालेला घोटाळा, प्लॉस्टीक कचरा निर्मुलन मध्ये शासनाचे नियम पाळले नाही, त्रैमासिक अहवाल शासनास पोहचू शकलो नाही. तसेच डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी मिळविलेली पदवी, प्रमाणपत्राची चौकशी तसेच काल प्रकार समोर आला की, राज्य शासनाने कोणतेच अधिकार दिले नसतांना त्यांनी सोनोग्राफी मशीन सील केले व ते लोक मा.कोर्टात गेले. मा.कोर्टाने असे म्हटले की, ते सील करण्याचे अधिकारच नव्हते म्हणून त्या केसेस खारीज केलेल्या आहेत यात महापालिकेची बदनामी झाली. या सर्व गोष्टीला जबाबदार कोण आहे? आताचे मा.आयुक्त कार्यवाही करतील, परंतु यापुर्वी ठराव घेतला त्याची अंमलबजावणी का केली नाही? शहर अभियंता, श्री.पानझडे यांना निलंबीत केले. डॉ.नाईकवाडे यांनाही निलंबीत केले. रूजू करून घ्या नसता आत्मदहन करतो असे त्यांनीही म्हटले तर आपण रूजू करणार का? डॉ.जयश्री कुलकर्णी यांचे विरोधात कर्मचारी असतांना त्यांचेकडून चुका झालेल्या असतांना पुन्हा ठराव येतो हे योग्य नाही.

उपआयुक्त-आस्थापना :कर्मचारी कोणत्याही दोषामुळे निलंबीत झाला,तरी त्यांस ५० टक्के पगार देतो.

श्री.राजेंद्र जंजाळ :५० टक्केच पगार द्यायला पाहिजे होता जी व्यक्ती महापालिकेत आजारीही नाही, कामावरही नाही त्यांना पुर्ण भत्त्यासह पगार दिला हे योग्य नाही.

श्री.भगवान घडमोडे :त्याच वेळी त्यांना रूजू का केले नाही.पगारासाठी त्या कोर्टात गेल्या का मा.कोर्टाचे आदेश काय आहे.

उपआयुक्त-आस्थापना :त्यांनी पिटीशन दाखल केले होते.मा.कोर्टाचे तसे आदेश नाही. परंतु एखादा कर्मचारी प्रतिक्षेवर असेल तर सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ९/१४ एफ नुसार नियुक्ती प्राधिकारी म्हणजे महापालिका यास त्याचे वेतन व भत्ते अदा करायचे अधिकार आहे.

श्री.भगवान घडमोडे :नियुक्ती प्राधिकारी महापालिका आहे असे सांगता, प्रस्ताव येण्यापुर्वी मंजूर होण्यापुर्वी संबंधीत डॉ. कुलकर्णी यांना पगार दिला व रूजू करून घेतले हे योग्य नाही माझी विनंती की हा ठराव रद्द करावा व मागच्या ठरावाची अंमलबजावणी करावी.

श्रीमती सिमा खरात :जे आरोप केले त्यास माझे सहमत आहे. मी सभापती असतांना समिती सभागृहात मिटींग झाली होती. मा.आयुक्त,स.पदाधिकारी उपस्थित होते. त्यावेळी डॉ.जयश्री कुलकर्णी यांचेकडे काम करणारे कर्मचारी त्यांचा निषेध करण्यासाठी काळे वस्त्र परीधान करून आले. त्यावेळी त्यांनी असे म्हटले की, डॉ.कुलकर्णी ह्या अर्वाच्च भाषेत बोलतात. केबीन मधून हाकलून देतात. रविवारी

कामावर बोलवितात. डॉ.कुलकर्णी या पदावर राहिल्या तर आम्ही राजीनामा देऊ. आता डॉ.कुलकर्णी यांना त्या पदावर ठेवून बाकीचे कर्मचारी यांना आत्महत्या करायला लावणार आहे काय?

श्री.भगवान घडमोडे :पगारा विषयी प्रकरण कोर्टात आहे.प्रशासन मा.कोर्टाला मानायला तयार नाही सर्वसाधारण सभेचे अधिकार आहे त्यासही मानायला तयार नाही.मनमानी करीत आहे हे बरोबर नाही.कक्ष अधिकारी यांचा काय पत्रव्यवहार झाला.

उपआयुक्त-आस्थापना :१९-८-२०१६ रोजीचे शासनाचे पत्र असून त्यासोबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.कुलकर्णी यांचे निवेदन आहे. त्यांचे ११ महिन्याचे पगार देणे बाबत कळविले आहे व डॉ. सुहास जगताप यांचे जागी त्यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर नियुक्ती मिळण्यास त्यांनी विनंती केली आहे व दिनांक २०.०८.२०१६ पर्यंत नियुक्ती न मिळाल्यास आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे. ते होऊ नये यासाठी दखल घ्यावी. योग्य ती काळजी घ्यावी. मा.न्यायालयात प्रकरण आहे. त्याची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे निर्णय घेतल्यानंतर तातडीने कळवीले जाईल. असे म्हटले आहे.

श्री.भगवान घडमोडे :यात त्यांचा पगार द्यावा असे म्हटले नाही. आत्महत्येपासून परावृत करावे, असे म्हटले, जनतेचा पैसो होता देऊन टाकला. त्या आत्महत्या करणार पोलीसात कळविले का? पैसे देण्याची गरज नव्हती. असे अनेक कर्मचारी निलंबीत आहे ठेकेदाराचे पैसे आहे, सर्व येतील पैसे द्या नसता आत्महत्या करतो असे बोलतील तर सर्वांना पैसे वाटप करणार काय?

श्री.फेरोज खान :सर्व ब्लॅकमेल करतील तर पैसे देणार काय? वार्डात कोणतेही विकास काम होत नाही. डॉ.कुलकर्णी डोळयांचे डॉक्टर आहे. महापालिकचे लाखोचे मशीनरी खराब होत आहे. त्याकडे लक्ष नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :त्यांना मलेरिया विभाग दिला त्यांचेकडील कर्मचारी यांची काम करण्याची इच्छा नाही. तसा अर्ज त्या कर्मचाऱ्यांनी मिळून दिला. यांचे वादात शहरातील आरोग्य धोक्यात आले..डॉ. कुलकर्णी यांचेमुळे दोन तीन लोकांनी राजीनामे दिले या प्रस्तावावर अभ्यास करून निर्णय घ्यावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :सध्या जे मा.आयुक्त आहे ते येण्याच्या पहिले या प्रकरणात भरपूर घडामोडी होऊन गेल्या अनेक आरोप डॉ.कुलकर्णी यांचेवर झालेले आहे.त्यांना पदावर रूजू करून घेणे साठी कुणाचेही मत नाही. सर्व सभागृह सर्व अधिकारी कर्मचारी त्यांचे विरोधात आहे असे असतांना अशा पध्दतीने प्रस्ताव प्रशासनाने आणायला नको होता सर्वाच्या भावना लक्षात घेता हा प्रस्ताव फेटाळण्यात यावा.

मा.महापौर :हा विषय डॉ.जयश्री कुलकर्णी यांचे संदर्भात आहे मागे त्यांना जो पगार दिला त्या संदर्भात विषय चर्चेला आला होता त्यांना वेटींगवर ठेवण्यात आले व पगार देण्यात आला वेटींगवर ठेवण्याची चुक ही प्रशासनाची आहे. त्यावेळी जे कुणी आस्थापना अधिकारी व तत्कालीन अधिकारी असतील त्यांचेकडून चुक झाली. त्यामूळे त्यांना जो पगार दिला आहे त्याची चौकशी करून तो खर्च त्यांचेकडून घेण्यात यावा व आताच सदस्यांनी वेगवेगळे विषय त्यांचे विषयी येथे सांगितले व मागिल जो ठराव त्यांचे बाबतीत झाला होता त्या ठरावाचा अभ्यास करावा व

आताच जे जे मुद्दे सदस्यांनी मांडले त्यात त्यात बायोमेडीकल वेस्ट असेल त्यांनी मिळविलेली पदवी अभ्यासक्रमा विषयी असेल मा.कोर्टातील प्रकरण या बाबीची माहिती घेवून चौकशी करावी व त्या या सर्व प्रकरणात निर्दोष असतील तर हा प्रस्ताव पुन्हा सादर करावा. अशा सुचना प्रशासनास देण्यात येते.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, डॉ.जयश्री कुलकर्णी यांना माहे सप्टेंबर-२०१५ ते माहे जुलै-२०१६ पर्यंतचे वेतन व भत्ते अदा करण्याचे अधिकार नियुक्ती अधिकारी, महासभा असुन महासभेसमोर प्रस्ताव येऊन त्यास मंजुरी होण्यापुर्वीच त्यांना रुपये ८,७०,४९७/- अदा करण्यात आले. जेव्हा डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी रुजू होण्यासाठी अर्ज केला त्यावेळेस त्यांना रुजू करून न घेता प्रतिक्षेवर ठेवण्यात आले. डॉ.जयश्री कुलकर्णी यांच्या संदर्भात जे मुद्दे मांडले त्यात बायोमेडीकल वेस्ट असेल, त्यांनी मिळविलेली पदवी, अभ्यासक्रमासाठी कार्यालयाची परवानगी घेतली होती का? पुर्णवेळ अभ्यासक्रम होता का? परिक्षेच्या वेळी रजा घेतली होती का? इत्यादींविषयी तसेच मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे शासनस्तरावरुन अंतिम निर्णय झाला का? त्यासह सध्याचे प्रलंबीत प्रकरणानुसार चौकशी तसेच दिनांक ०७.०१.२०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक-२७४ अशा सर्व बाबींची माहिती घेऊन चौकशी करावी व या सर्व प्रकरणात त्या निर्दोष असतील तर सविस्तर अहवालासह हा प्रस्ताव पुन्हा सादर करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

(विषय क्रमांक-५८० ते ६०४ मंजूर, तसेच ऐनवेळचे प्रशासनाचे विषय सभेच्या कामकाजानुसार पान क्रमांक-१४ वर मंजूर झालेले आहेत.)

**विषय क्रमांक ५८०:-** **(दिनांक १०.०८.२०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील (का.प.क्र.२५) मनपा पोटनिवडणुकीच्या आचारसंहितेमुळे स्थगीत ठेवण्यात आलेला विषय क्र.५०६)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२१, बुढ्ढीलाईन मध्ये कबाडीपुरा हा मोहल्ला आहे. परंतु कबाडीपुरा हे नाव अतिशय विचीत्र व खराब आहे. कारण कबाड याचा अर्थ घाण, कचरा असा होतो. त्यामुळे सदरील नाव हे ऐतिहासीक अशा औरंगाबाद शहरातील एखाद्या मोहल्ल्यास शोभुन दिसत नाही. कबाडीपुरा या मोहल्ल्यात हजरत शाह जमाल (रहे.) यांची दर्गा मागील ५०० वर्षापासून अस्तित्वात असून ऐतिहासीक औरंगाबाद शहरातूनच नव्हे तर संपुर्ण मराठवाड्यातून येथे भाविक दर्शनासाठी येतात. म्हणून कबाडीपुरा या मोहल्ल्यातील सर्व रहिवासीयांच्या मागणीनुसार कबाडीपुरा मोहल्ल्याचे नाव बदलून हजरत शाह जमाल (रहे.) असे ठेवण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-** श्री.गंगाधर नामदेव ढगे, श्रीमती खान सायराबानो अजमल, श्री.खान इरशाद इब्राहीम

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२१, बुढ्ढीलाईन मधील कबाडीपुरा मोहल्ल्याचे नाव बदलून हजरत शाह जमाल (रहे.) असे नियमाप्रमाणे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१ हा स्लम घोषित असून या भागात अत्यंत खराब रस्ते असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून शासनाच्या दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत या भागात कॉंक्रेट रस्ते तयार करणेसाठी र.रु.६० लाख निधी आवश्यक आहे.

करीता सदरील काम करण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे **अनुमोदक:-** श्रीमती ज्योती जयेश अभंग,

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०१,येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत कॉंक्रेट रस्ते तयार करणेसाठी र.रु.६० लक्षचा निधी मिळणे करीता नियमाप्रमाणे प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१ हा स्लम घोषित असुन या भागात विद्युत पथदिवे नसल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून शासनाच्या दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत या भागात नविन विद्युत पथदिवे लावण्यासाठी र.रु.६० लाख निधी आवश्यक आहे.

करीता, सदरील काम करण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे **अनुमोदक:-** श्रीमती ज्योती जयेश अभंग,

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०१,येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत नविन विद्युत पथदिवे लावण्यासाठी र.रु.६० लक्षचा निधी मिळणे करीता नियमाप्रमाणे प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या मुळ अर्थसंकल्पामधील खालील कामांचे लेखाशिर्ष नागरीकांच्या सुविधेसाठी बदलण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

| Page No. | अ.क्र. | जुने कामाचे नांव | नविन कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ४६ | ९ | वॉर्ड क्र.१०१, अंतर्गत असलेल्या विविध ठिकाणच्या सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे. १०००/- | वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत फुलेनगर भागातील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे. | ५००/- |
| | | | वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत विविध विकास कामे करणे. | ५००/- |
| १२ | ०२ | वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर स्लम भागातील शौचालयाची दुरुस्ती करणे.१०००/- | वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत तुलसी हौ.सो.येथे विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे. | १०००/- |

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-** श्रीमती ज्योती जयेश अभंग, श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या मुळ अर्थसंकल्पामधील खालील कामांचे लेखाशिर्ष नागरीकांच्या सुविधेसाठी बदलण्यास नियमाप्रमाणे मंजुरी देण्यात येते.

| Page No. | अ.क्र. | जुने कामाचे नांव | नविन कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ४६ | ९ | वॉर्ड क्र.१०१, अंतर्गत असलेल्या विविध ठिकाणच्या सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे. १०००/- | वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत फुलेनगर भागातील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे. | ५००/- |
| | | | वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत विविध विकास कामे करणे. | ५००/- |
| १२ | ०२ | वॉर्ड क्र.१०१, फुलेनगर स्लम भागातील शौचालयाची दुरुस्ती करणे.१०००/- | वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत तुलसी हौ.सो.येथे विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे. | १०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१ हा स्लम घोषित असुन या भागात ड्रेनेज लाईन अत्यंत खराब असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून शासनाच्या दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत या भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी र.रु.६० लाख निधी आवश्यक आहे.

करीता सदरील काम करणेसाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे **अनुमोदक:-** श्रीमती ज्योती जयेश अभंग,

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०१ येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत या भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी र.रु.६० लक्षचा निधी मिळणे करीता नियमाप्रमाणे प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०१, हा स्लम घोषित वॉर्ड असून एकनाथनगर येथील मनपाच्या शाळेत १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग सुरु आहेत. या शाळेत गरीब, कष्टकरी सर्वसामान्य घराण्यातील मुले शिक्षण घेण्यासाठी येतात. सातवीच्या पुढे वर्ग नसल्याने ते आपल्या मुलांना पुढील शिक्षण देऊ शकत नाहीत. करीता, एकनाथ नगर येथील महानगरपालिका शाळेत पुढील ८ वी ते १० वी चे वर्ग सुरु करण्यात यावेत. अशी मागणी अनेक वर्षापासुन येथील नागरीक करीत असून नागरीकांच्या भावनेचा आदर करुन एकनाथ नगर येथील मनपा शाळेत ८ वी ते १० वी चे वर्ग सुरु

करून या शाळेस आवश्यकतेनुसार शिक्षकांची नियुक्ती, फर्निचर तसेच शालेय साहित्य पुरविण्यात यावे यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-** श्रीमती ज्योती जयेश अभंग, श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०१, एकनाथ नगर येथील मनपा शाळेत ८ वती ते १० वी चे वर्ग सुरु करण्यास तसेच या शाळेस आवश्यकतेनुसार शिक्षकांची नियुक्ती, फर्निचर तसेच शालेय साहित्य पुरविण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०४ या भागात अनुसूचित जमातीची लोकसंख्या ६० टक्के पेक्षा जास्त असुन या भागात रस्ते खराब असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून शासनाच्या दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत या भागात रस्त्यांच्या कामासाठी र.रु.६० लाख निधी मिळणे आवश्यक आहे.

करीता सदरील काम करणेसाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती ज्योती जयेश अभंग **अनुमोदक:-** श्रीमती लता मगन निकाळजे

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०४ येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रस्त्यांच्या कामासाठी र.रु.६० लक्षचा निधी मिळणे करीता नियमाप्रमाणे प्रस्ताव जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०४ या भागात अनुसूचित जमातीची लोकसंख्या ६० टक्के पेक्षा जास्त असुन या भागात ड्रेनेज लाईन (मलनि:सारण) पुर्णपणे खराब झाली असून नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून शासनाच्या दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत या भागात ड्रेनेज लाईनच्या कामासाठी र.रु.६० लाख निधी मिळणे आवश्यक आहे.

करीता, सदरील काम करणेसाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती ज्योती जयेश अभंग **अनुमोदक:-** श्रीमती लता मगन निकाळजे

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०४ येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन (मलनि:सारण) टाकण्याच्या कामासाठी र.रु.६० लक्षचा निधी मिळणे करीता प्रस्ताव नियमाप्रमाणे जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये वॉर्ड क्र.१७ नंदनवन कॉलनी येथील मारोती मंदीर ते नितीन जिवरग यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट करणे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २५.०० लक्ष GBR Page No.३ S.N.२२ या कामाच्या ऐवजी वॉर्ड क्र.१७ नंदनवन कॉलनी येथील राजमाता जिजाऊ उद्यानात विविध ठिकाणी विकास कामे व खेळणी बसविणे असा लेखाशिर्ष बदल करून देण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे **अनुमोदक:-**श्रीमती विजया संजय बनकर

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये वॉर्ड क्र.१७ नंदनवन कॉलनी येथील मारोती मंदीर ते नितीन जिवरग यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट करण्याच्या कामाऐवजी वॉर्ड क्र.१७ नंदनवन कॉलनी येथील राजमाता जिजाऊ उद्यानात नियमाप्रमाणे विविध ठिकाणी विकास कामे करणे व खेळणी बसविणेच्या कामासाठी रक्कम रुपये २५.०० लक्षच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील वॉर्ड क्र.२० करीता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| SCR Ward-A p.no. 1 | वॉर्ड क्र.२० विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. आर्थिक तरतुद १० लक्ष | १. वार्ड क्र.२० मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची विविध कामे करणे.<br>या कामासाठी१०१२<br>सदरील तरतुदी मधुन र.रु.५ लक्ष वळती करण्यात यावी.<br>२. वॉर्ड क्र.२० मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रेटचे कामे करणे.<br>या कामासाठी सदरील तरतुदी मधुन र.रु.५ लक्ष वळती करण्यात यावे. |

**सुचक:-**श्री.सय्यद मतीन रशीद **अनुमोदक:-** श्रीमती खान सायरा बानो अजमल

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील वॉर्ड क्र.२० करीता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| SCR Ward-A p.no. 1 | वॉर्ड क्र.२० विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. आर्थिक तरतुद १० लक्ष | १. वार्ड क्र.२० मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची विविध कामे करणे.<br>या कामासाठी१०१२<br>सदरील तरतुदी मधुन र.रु.५ लक्ष वळती करण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | २. वॉर्ड क्र.२० मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रेटचे कामे करणे. या कामासाठी सदरील तरतुदी मधुन र.रु.५ लक्ष वळती करण्यात यावे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील वॉर्ड क्र.२० करीता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| SCR Ward-A p.no. 1 | वॉर्ड क्र.२० जयभिमनगर मधील सभागृहाची दुरूस्ती करणे व रंगरंगोटी करणे.<br>आर्थिक तरतुद २.५० लक्ष | वॉर्ड क्र.२० मधील बेगमपुरा पोलिस चौकी समोरील मनपा उद्यानातील देखभाल व दुरूस्तीचे विविध कामे करणे.<br>या कामासाठी सदरील तरतुद मधुन वळती करण्यात यावी. |

**सुचक:-**श्री.सय्यद मतीन रशीद **अनुमोदक:-** श्री.विकास प्रकाश एडके

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील वॉर्ड क्र.२० करीता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| SCR Ward-A p.no. 1 | वॉर्ड क्र.२० जयभिमनगर मधील सभागृहाची दुरूस्ती करणे व रंगरंगोटी करणे.<br>आर्थिक तरतुद २.५० लक्ष | वॉर्ड क्र.२० मधील बेगमपुरा पोलिस चौकी समोरील मनपा उद्यानातील देखभाल व दुरूस्तीचे विविध कामे करणे.<br>या कामासाठी सदरील तरतुद मधुन वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील वॉर्ड क्र.७२ क्रांती चौक करीता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. | अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| GBR Ward – D p.no.3 | ०२ | वॉर्ड क्र.७२ क्रांती चौक भागातील विविध ठिकाणी पोलसह पथदिवे बसविणे. र.रु.२.९० लक्ष | ॲड.करवा यांच्या घरापासून ते वर्मा चौक पर्यंत रस्त्याचे |
| Lay-out New Work P.no.07 | ०८ | वॉर्ड क्र.७२ क्रांती चौक भागातील स्वरसंगम हौ.सो. भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. र.रु.१२ लक्ष | |

| | | | |
|---|---|---|---|
| SCR-Ward-D P.NO.31 | १३ | वॉर्ड क्र.७२ क्रांती चौक अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे. र.रु.५ लक्ष | कॉंक्रीटीकरण करणे र.रु.१९.९० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती शिल्पाराणी सागर वाडकर **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील वॉर्ड क्र.७२ क्रांती चौक करीता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. | अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| GBR Ward – D p.no.3 | ०२ | वॉर्ड क्र.७२ क्रांती चौक भागातील विविध ठिकाणी पोलसह पथदिवे बसविणे. र.रु.२.९० लक्ष | ॲड.करवा यांच्या घरापासून ते वर्मा चौक पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे र.रु.१९.९० लक्ष |
| Lay-out New Work P.no.07 | ०८ | वॉर्ड क्र.७२ क्रांती चौक भागातील स्वरसंगम हौ.सो. भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. र.रु.१२ लक्ष | |
| SCR-Ward-D P.NO.31 | १३ | वॉर्ड क्र.७२ क्रांती चौक अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे. र.रु.५ लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. | अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| Pre-poor Budget New Work p.no.7 | २९ | वॉर्ड क्र.६० अंतर्गत ग.नं.२० डी येथील कॉंक्रेट करणे. आर्थिक तरतुद ४५० लक्ष | वॉर्ड क्र.६० अंतर्गत इंदिरानगर उ.बायजीपुरा गल्ली नं.१९ आडवी गल्ली मध्ये कॉंक्रेट या कामासाठी सदरील तरतुद वळती करण्यात यावी. |
| Ward-C-spill p.no.31 | ३३ | वॉर्ड क्र.६० इंदिरानगर उत्तर बायजीपुरा येथे ग.नं.६ व इतर ठिकाणी ट्रिमीक्स कॉंक्रेटींग करणे.<br>आर्थिक तरतुद १०३० लक्ष | वॉर्ड क्र.६० इंदिरानगर उत्तर बायजीपुरा येथे ग.नं.८ नुर मस्जीदच्या गल्लीत ट्रिमिक्स कॉंक्रेटींग करणे या कामासाठी सदरील तरतुद वळती करण्यात यावी. |

**सुचक:-**श्री.शेख जफर अख्तर **अनुमोदक:-**श्री.खान इरशाद इब्राहिम

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसकंल्प २०१६-१७ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. | अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| Pre-poor Budget New Work p.no.7 | २९ | वॉर्ड क्र.६० अंतर्गत ग.नं.२० डी येथील कॉंक्रेट करणे. आर्थिक तरतुद ४५० लक्ष | वॉर्ड क्र.६० अंतर्गत इंदिरानगर उ.बायजीपुरा गल्ली नं.१९ आडवी गल्ली मध्ये कॉंक्रेट या कामासाठी सदरील तरतुद वळती करण्यात यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| Ward-C-spill p.no.31 | ३३ | वॉर्ड क्र.६० इंदिरानगर उत्तर बायजीपुरा येथे ग.नं.६ व इतर ठिकाणी ट्रिमीक्स कॉंक्रेटींग करणे.<br>आर्थिक तरतुद १०३० लक्ष | वॉर्ड क्र.६० इंदिरानगर उत्तर बायजीपुरा येथे ग.नं.८ नुर मस्जीदच्या गल्लीत ट्रिमिक्स कॉंक्रेटींग करणे या कामासाठी सदरील तरतुद वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५९३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. | अ.क्र | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| एससीआर वार्ड सी.पान क्र.२४ | ०६ | वॉर्ड क्र.४१ रहेमानिया कॉलनी नेहरुनगर गल्ली क्र.१ व २ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. आर्थिक तरतुद १० लक्ष | वॉर्ड क्र.४१ रहेमानिया कॉलनी नेहरुनगर गल्ली क्र.१ व २ मध्ये कॉंक्रेटींग करणे. या कामासाठी सदरील तरतुद वळती करण्यात यावी. |

**सुचक:-**श्री.खान इरशाद इब्राहिम **अनुमोदक:-** श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. | अ.क्र | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| एससीआर वार्ड सी.पान क्र.२४ | ०६ | वॉर्ड क्र.४१ रहेमानिया कॉलनी नेहरुनगर गल्ली क्र.१ व २ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. आर्थिक तरतुद १० लक्ष | वॉर्ड क्र.४१ रहेमानिया कॉलनी नेहरुनगर गल्ली क्र.१ व २ मध्ये कॉंक्रेटींग करणे. या कामासाठी सदरील तरतुद वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५९४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६३ अविष्कार कॉलनी अंतर्गत बॅटमिंटन हॉलच्या बाजुला खुली जागा असून तेथे वयोवृध्द, वारकरी यांना थकवा दुर करण्यासाठी तसेच पावसाळा व उन्हाळ्यात कॉलनी मधील वयोवृध्द लोकांना बसण्यासाठी शेड व खुर्च्यांची व्यवस्था करणे गरजेचे आहे. तरी सदरील कामासाठी अंदाजे रक्कम रुपये २,००,०००/- (रुपये दोन लाख) एवढा खर्च अपेक्षीत आहे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अब्दुल रहीम शेख नाईकवाडी

**अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी, श्रीमती संगिता सुभाष वाघुले.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६३ अविष्कार कॉलनी अंतर्गत बॅटमिंटन हॉलच्या बाजुला असलेल्या खुल्या जागेत वयोवृध्द, वारकरी यांना बसण्यासाठी नियमाप्रमाणे शेड व खुर्च्यांची व्यवस्था करण्याच्या कामासाठी र.रु.२,००,०००/- (रुपये दोन लाख) एवढ्या अपेक्षीत खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारे दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड फ पान क्र.४५ वरील अ.क्र.०४ वर वॉर्ड क्र.१०९ प्रतापनगर अंतर्गत स्मशानभुमी ते देवानगरी उड्डाणपुलापर्यंत डांबरीकरण करणे. र.रु.२५.०० लक्ष | प्रभाग क्रमांक १०९ प्रतापनगर अंतर्गत प्रतापनगर ते प्रशांतनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे र.रु.२५.०० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती शोभा गुरूलिंगप्पा बुरांडे **अनुमोदक:-**श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात एससीआर वॉर्ड फ पान क्र.४५ वरील अ.क्र.०४ वर वॉर्ड क्र.१०९ प्रतापनगर अंतर्गत स्मशानभुमी ते देवानगरी उड्डाणपुलापर्यंत डांबरीकरण करणे. र.रु.२५.०० लक्ष | प्रभाग क्रमांक १०९ प्रतापनगर अंतर्गत प्रतापनगर ते प्रशांतनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे र.रु.२५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २०१६-१७ मध्ये समाविष्ट केलेल्या काही विकास कामे अत्यावश्यक कामाकरीता वळती करणेसाठी खालीलप्रमाणे बदलण्यात यावे.

कामाचे नाव-मंजुर रेखांकना अंतर्गत

१. सद्‌गुरू हौ.सो.चिकलठाणा अंतर्गत विविध विकास कामे करणे.-१००० हे काम बदलुन चौधरी कॉलनी,महादेव गल्ली येथे कॉँक्रीटीकरण करणे असे करण्यात यावे.
२. प्रो-पुअर बजेट अंतर्गत वॉर्ड क्र.३७ मसनतपुर येथील ड्रेनेज लाईन बदलणे व दुरूस्त करणे.-१२०० हे काम बदलून वॉर्ड क्र.३७ अंतर्गत विविध ठिकाणी कॉँक्रीटीकरण करणे असे करण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती वैशाली कारभारी जाधव **अनुमोदक:-**श्री.सोहेल शकील शेख

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

१. सद्गुरू हौ.सो.चिकलठाणा अंतर्गत विविध विकास कामे करणे.-१००० हे काम बदलुन चौधरी कॉलनी,महादेव गल्ली येथे कॉंक्रीटीकरण करणे असे करण्यात यावे.
२. प्रो-पुअर बजेट अंतर्गत वॉर्ड क्र.३७ मसनतपुर येथील ड्रेनेज लाईन बदलणे व दुरूस्त करणे.-१२०० हे काम बदलून वॉर्ड क्र.३७ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे असे करण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा सर्वसाधारण सभा दिनांक २०.०४.२०१६ मधील विषय क्रमांक ३८७ नुसार वॉर्ड क्र.४१ मधील जफरनगर येथील मनपाचे सामाजिक सभागृहात वाचनालय सुरू करण्यासाठी ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आलेला आहे.

सदरील ठिकाणी सुरू करण्यात येणाऱ्या वाचनालयास या भागातील ज्येष्ठ रहिवासी मरहुम हाजी मोहम्मद हनीफ यांचे नाव देण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान इरशाद इब्राहिम **अनुमोदक:-**श्री.शेख जफर अख्तर

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभा दिनांक २०.०४.२०१६ मधील विषय क्रमांक ३८७ नुसार वॉर्ड क्र.४१ मधील जफरनगर येथील मनपाच्या सामाजिक सभागृहात सुरू करण्यात येणाऱ्या वाचनालयास नियमाप्रमाणे या भागातील ज्येष्ठ रहिवासी मरहुम हाजी मोहम्मद हनीफ यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-८०, एन-४, सी-सेक्टर परिसरात एक गार्डन असुन या गार्डनला "विसावा गार्डन" असे नाव देण्यात यावे अशी मागणी या परिसरातील नागरीकांनी केलेली आहे.

नागरीकांच्या मागणीचा विचार करता एन-४,सी-सेक्टर मधील गार्डनला "विसावा गार्डन" असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड **अनुमोदक:-**श्रीमती माधुरी मिलींद देशमुख

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-८०, एन-४,सी-सेक्टर परिसरातील गार्डनला नियमाप्रमाणे "विसावा गार्डन" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अंदाजपत्रक सन २०१६-१७ मध्ये स्थायी समितीने शिफारस केलेल्या SCR-Ward-E-P.No-३४ वर दर्शवलेल्या कामाचे लेखाशिर्षक बदलण्यात यावे.

| P.No. | अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|---|
| ३४ | ०३ | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणे - रु.३० लाख |

त्याऐवजी

| P.No. | अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|---|
| ३४ | ०३ | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे - रु.३० लाख |

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती मोरे ज्योती राजाराम **अनुमोदक:-**श्री. पवार आत्माराम माणिकराव

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| P.No. | अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|---|
| ३४ | ०३ | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणे - रु.३० लाख |

त्याऐवजी

| P.No. | अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|---|
| ३४ | ०३ | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे - रु.३० लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९५ मध्ये विजय नगर व अजिंक्य नगर या भागात बहुसंख्य अनुसूचित जाती जमातीचे नागरीक कित्येक दिवसापासुन राहतात. त्यांना लागणाऱ्या सुविधा, पाणी पुरवठा, पाईप लाईन, ड्रेनेज लाईन, विद्युत पथदिवे, समाज मंदिर, सार्वजनिक शौचालय, आरोग्य केंद्र, कॉंक्रीट रस्ते या पासुन संबंधीत नागरीक वंचित आहेत.

करीता, शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेतुन वरील प्रकारची विकास कामे करण्यासाठी अंदाजपत्रके तयार करुन निधी प्राप्त करुन घेण्यासाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे मंजुरीस पाठविण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मोरे ज्योती राजाराम

**अनुमोदक:-**श्री.पवार आत्माराम माणिकराव, श्री.जगताप कमलाकर शामराव

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९५, विजय नगर व अजिंक्य नगर या भागात शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत पाणी पुरवठा, पाईप लाईन, ड्रेनेज लाईन, विद्युत पथदिवे, समाज मंदिर, सार्वजनिक शौचालय, आरोग्य केंद्र, कॉंक्रीट रस्ते इत्यादी विकास कामे करण्यासाठी नियमाप्रमाणे अंदाजपत्रके तयार करुन निधी प्राप्त करुन घेण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे वळती व कामाचे नावात दुरुस्ती करण्यात यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | ऐवजी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.४२ अंतर्गत विविध ठिकाणी गटार दुरुस्ती करणे. ३.०० लक्ष | वॉर्ड क्र.४२ अंतर्गत विविध मेनहोल चेंबर बांधणे व नविन ढापे टाकणे ३.०० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.४२ किराडपुरा अंतर्गत बदाम गल्ली रस्त्यास कॉंक्रेटींग करणे १५.०० लक्ष. | १) वॉर्ड क्र.४२ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे ५.०० लक्ष.<br>२) वॉर्ड क्र.४२ येथील मकबुल भाई यांच्या गल्लीत कॉंक्रेट करणे ५.०० लक्ष.<br>३) वॉर्ड क्र.४२ येथील विविध ठिकाणी विद्युतीकरणाची विविध कामे करणे ५.०० लक्ष. |
| ३. | वॉर्ड क्र.४४ किराडपुरा मधील घडी वाली गल्लीत कॉंक्रीटींग करणे १०.०० लक्ष | वॉर्ड क्र.४२,किराडपुरा मधील नाल्या लगत म्हशीच्या तबेल्या जवळील गल्लयांमध्ये कॉंक्रीटींग करणे १०.०० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती नसीम बी सांडु खॉ **अनुमोदक:-**श्री.मो.अय्युब गुलाम जिलानी

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष नियमाप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | ऐवजी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.४२ अंतर्गत विविध ठिकाणी गटार दुरुस्ती करणे. ३.०० लक्ष | वॉर्ड क्र.४२ अंतर्गत विविध मेनहोल चेंबर बांधणे व नविन ढापे टाकणे ३.०० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.४२ किराडपुरा अंतर्गत बदाम गल्ली रस्त्यास कॉंक्रेटींग करणे १५.०० लक्ष. | १) वॉर्ड क्र.४२ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे ५.०० लक्ष.<br>२) वॉर्ड क्र.४२ येथील मकबुल भाई यांच्या गल्लीत कॉंक्रेट करणे ५.०० लक्ष.<br>३) वॉर्ड क्र.४२ येथील विविध ठिकाणी विद्युतीकरणाची विविध कामे करणे ५.०० लक्ष. |
| ३. | वॉर्ड क्र.४४ किराडपुरा मधील घडी वाली गल्लीत कॉंक्रीटींग करणे १०.०० लक्ष | वॉर्ड क्र.४२,किराडपुरा मधील नाल्या लगत म्हशीच्या तबेल्या जवळील गल्लयांमध्ये कॉंक्रीटींग करणे १०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९४ या भागामध्ये भारतनगर, आनंदनगर, हनुमाननगर हा भाग दलित वस्ती मध्ये येत असुन येथील लोकसंख्या जवळ जवळ २० ते २५ हजार असुन येथील नागरीकांच्या मुलभुत सुविधा म्हणजे पिण्याचे पाणी, पाईप लाईन, ड्रेनेज लाईन, संरक्षित भिंत, विजेचे पथदिवे, नागरीकांसाठी आरोग्य केंद्र, येथिल शाळा व रस्ते या समस्या असुन या वस्त्या ५०% पेक्षा दलित वस्ती घोषित करण्यात आलेल्या आहेत. या वस्तीचे प्रमाणपत्र सुध्दा देण्यात आलेले आहे.

तरी, या वॉर्डातील मनुष्याच्या जिवन जगण्यासाठी लागणाऱ्या मुलभूत सुविधा मिळण्याकरीता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा व मंजुर करण्या करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.पवार आत्माराम माणिकराव **अनुमोदक:-** श्री.जगताप कमलाकर शामराव

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९४ येथे अंतर्गत असलेल्या भारतनगर, आनंदनगर, हनुमाननगर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत मुलभूत नागरी सुविधा मिळण्याकरीता नियमाप्रमाणे प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६, नारेगांव-ब्रिजवाडी अंतर्गत उत्तरानगरी ही गत् १५ वर्षापासुन उत्तरानगरी हा भाग महापालिकेच्या अंतर्गत आहे. तथापि, या भागातील नागरी सुविधांचा विकास झालेला नाही व आतापर्यंत महानगरपालिकेचा मालमत्ता कर येथील नागरीक नियमीत भरत असुन जवळपास रुपये ८५ लाखाचा कर भरलेला आहे. हि वसाहत कायदेशीर आहे. या वसाहतीमध्ये खालील कामे तातडीने करणे आवश्यक आहे.

१) गल्ली क्र.०१ (मराठे सर गल्ली) सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता करणे रु.१५ लाख
२) गल्ली क्र.०२ येथे सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता करणे रु.१७ लाख
३) वसाहतीतील मुख्य रस्ता पॉवरलुम ते श्री स्वामी समर्थ मंदिर हा सिमेंट कॉंक्रीटचा करणे रु.७० लाख
४) जयभीम चौक ते तथागत चौक ते कब्रस्थान हा रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा करणे रु.७५ लाख
५) राजेंद्रनगर मेनरोड ते गणपती मंदिर हा मुख्य रस्ता कॉंक्रटीकरण करणे रु.४० लाख

वरीलप्रमाणे कामे प्रस्तावित करण्यासाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करुन सदरील कामांची अंदाजपत्रके तयार करावीत. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-** श्री.नितीन रमन चित्ते

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, नारेगांव-ब्रिजवाडी अंतर्गत १ ते ५ च्या कामांसाठी नियमाप्रमाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करुन देण्यासाठी अंदाजपत्रके तयार करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६, नारेगांव-ब्रिजवाडी अंतर्गत ब्रिजवाडी या वसाहतीत दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील कामे करण्याची आवश्यकता आहे.

१) श्री राजु ढगे यांच्या गल्लीत सिमेंट कॉंक्रटीकरण करणे रु.१० लाख
२) व्यायामशाळेची गल्ली दोन्ही बाजुने सिमेंट कॉंक्रटीकरण करणे रु.१५ लाख
३) माऊली किराणा स्टोअरची गल्ली सिमेंट कॉंक्रटीकरण करणे रु.०७ लाख
४) भारतनगर अंतर्गत गल्ली सिमेंट कॉंक्रटीकरण करणे रु.११ लाख
५) रिक्षा स्टॅंड ते कमान क्रमांक ०१ मुख्य रस्ता कॉंक्रटीकरण करणे रु.५० लाख

वरीलप्रमाणे कामे प्रस्तावित करण्यासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-** श्री.नितीन रमन चित्ते

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, नारेगांव-ब्रिजवाडी येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत

१) श्री राजु ढगे यांच्या गल्लीत सिमेंट कॉंक्रटीकरण करणे रु.१० लाख
२) व्यायामशाळेची गल्ली दोन्ही बाजुने सिमेंट कॉंक्रटीकरण करणे रु.१५ लाख
३) माऊली किराणा स्टोअरची गल्ली सिमेंट कॉंक्रटीकरण करणे रु.०७ लाख
४) भारतनगर अंतर्गत गल्ली सिमेंट कॉंक्रटीकरण करणे रु.११ लाख
५) रिक्षा स्टँड ते कमान क्रमांक ०१ मुख्य रस्ता कॉंक्रटीकरण करणे रु.५० लाख

विविध विकास कामे करणे निधी मिळणे करीता प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळीचे विषय

**विषय क्रमांक ६०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.गोविंद श्रीराम काथार राहणार औरंगाबाद यांची लिव्हर व किडनी निकामी झालेली आहे. त्यामुळे त्यांना उपचारासाठी पैशाची आवश्यकता आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. घरातील ते एकमात्र कमावते व्यक्ती असुन संपुर्ण घर त्याच्यावर अवलंबुन आहे.

करीता, त्यांच्या परिस्थितीचा सहानुभूती पुर्वक विचार करुन त्यांना लिव्हर व किडनी या आजाराच्या उपचारासाठी महानगरपालिकेमार्फत र.रु.२५०००/- (अक्षरी रक्क्म रुपये पंचवीस हजार फक्त) ची मदत करण्यात यावे.

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मनोज आसाराम बल्लाळ **अनुमोदक:-** श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.गोविंद श्रीराम काथार, औरंगाबाद यांची लिव्हर व किडनी या आजाराच्या उपचारासाठी महानगरपालिकेमार्फत र.रु.२५०००/- (अक्षरी रक्क्म रुपये पंचवीस हजार फक्त) ची मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सुनिल बाबुराव जायभाये राहणार एन-११,सी-सेक्टर हडको, औरंगाबाद हे कॅन्सर या दुर्धर रोगाने आजारी आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. ते गजानन महाराज मंदिरात सेवक म्हणुन तात्पुरता स्वरुपात काम करतात. घरातील ते एकमात्र कामावते व्यक्ती असुन संपुर्ण घर त्यांच्यावर अवलंबुन आहे. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

करीता, त्यांच्या परिस्थितीचा सहानुभूती पुर्वक विचार करुन त्यांना कॅन्सर या आजाराच्या उपचारासाठी महानगरपालिकेमार्फत र.रु.२५०००/- (अक्षरी रक्क्म रुपये पंचवीस हजार फक्त) ची मदत करण्यात यावे.

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-**श्री.सुभाष सयाजी शेजवळ

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सुनिल बाबुराव जायभाये राहणार एन-११,सी-सेक्टर, हडको, औरंगाबाद यांना कॅन्सर या दुर्धर आजाराच्या उपचारासाठी महानगरपालिकेमार्फत र.रु.२५०००/- (अक्षरी रक्क्म रुपये पंचवीस हजार फक्त) ची मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.विकास एकनाथराव इंगळे, औरंगाबाद यांची “एशियन बिच स्पर्धा-२०१६” ह्या व्हिएतनाम येथे आयोजित स्पर्धा करिता निवड झालेली आहे. वरील स्पर्धेसाठी त्यांना १.०० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

आपल्या शहरातील व्यक्ती आंतरराष्ट्रीय पातळीवर “एशियन बिच स्पर्धा-२०१६” सारख्या स्पर्धेत भाग घेत आहे. त्यामुळे महानगरपालिकेमार्फत श्री.विकास एकनाथराव इंगळे यांना रुपये २५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस हजार फक्त) आर्थिक मदत करावी.

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले **अनुमोदक:-**श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, “एशियन बिच स्पर्धा-२०१६” ह्या व्हिएतनाम येथे आयोजित स्पर्धेत निवड झालेल्या श्री.विकास एकनाथराव इंगळे, औरंगाबाद यांना महानगरपालिकेमार्फत र.रु.२५०००/- लाख (अक्षरी रक्क्म रुपये पंचवीस हजार फक्त) ची मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर, एन-१२ येथील गणेश विसर्जन विहिरीलगतच्या ड्रेनेज मेनहोल मध्ये दिनांक २९.०८.२०१६ रोजी गंभीर अपघात झाला. या अपघातात ड्रेनेजच्या रासायनिक वायु मध्ये गुदमरल्यामुळे एक स्वच्छता कर्मचारी श्री.प्रदिप हरिशचंद्र घुले यांचा शासकीय रुग्णालय घाटी येथे पोहोचण्यापुर्वीच मृत्यु झाला. यांच्या कुटूंबीयांना रु.५,००,०००/- एवढी रक्कम देण्यास मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. याच अपघातातील दुसरे स्वच्छता कर्मचारी श्री.शेख अकबर शेख ख्वाजा यांना सर्वोत्कृष्ठ उपचार मिळून त्यांचा जीव वाचण्यासाठी मा.महापौर महोदय व मा.आयुक्त महोदय यांनी तातडीने आदेशीत केल्यानुसार प्रथम दिनांक २९.०८.२०१६ ते ३१.०८.२०१६ पर्यंत एम्स हॉस्पीटल एन-११ सिडको येथे व तद्‌नंतर सिग्मा हॉस्पीटल शहानुरवाडी येथे दिनांक ३१.०८.२०१६ ते ०७.०९.२०१६ पर्यंत उपचारासाठी दाखल/ॲडमीट करण्यात आले होते. सध्या त्यांना उपचाराअंती हॉस्पीटल मधून मुक्त/डिस्चार्ज करण्यात आले आहे. तथापि, सदर अपघातामुळे श्री.शेख अकबर यांच्या मध्ये काम करण्याची क्षमता नसल्याने पुढील सहा महिन्यांपर्यंत त्यांना काम करता येणे शक्य नाही. त्यामुळे माणुसकीच्या नात्याने महानगरपालिकेमार्फत त्यांना रु.१,००,०००/- अधिक उपरोक्त दोन्ही हॉस्पीटल मध्ये झालेला खर्च रु.८३,२८५/- असे एकुण रु.१,८३,२८५/- श्री.शेख अकबर शेख ख्वाजा यांना अदा करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर. उक्त रक्कमेची विभागणी खालीलप्रमाणे: श्री.शेख अकबर शेख ख्वाजा र.रू.१,३३,४८६/-, युनाईटेड सिग्मा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस प्रा.लि.र.रु.४९,७९९/-

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर, एन-१२ येथील गणेश विसर्जन विहिरीलगतच्या ड्रेनेज मेनहोल मध्ये दिनांक २९.०८.२०१६ रोजी अपघातात गंभीर जखमी झालेले स्वच्छता कर्मचारी श्री.शेख अकबर शेख ख्वाजा यांना महानगरपालिकेमार्फत रु.१,३३,४८६/- अधिक युनाईटेड सिग्मा इन्स्टिटट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस प्रा.लि. या दवाखान्यात आलेला खर्च र.रु.४९,७९९/- असे एकूण र.रु.१,८३,२८५/- अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५५, भवानी नगर या प्रभागामध्ये जुना मोंढा येथे महानगरपालिकेची जागा असुन सदर ठिकाणी अनधिकृतपणे लोकांनी ताबा केलेला आहे. सदरील ठिकाणचा ताबा काढून त्या जागेवर महानगरपालिकेने व्यापारी संकुल बांधल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. त्यासाठी महानगरपालिकेने ठोस निर्णय घेऊन खालील नमुद केलेल्या जागांवर भव्य व्यापारी संकुल बांधण्यात यावे.

०१. हरी मस्जिद शेजारील जागा.
०२. जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा शहागंज (जुना मोंढा)
०३. रोहिदास मंदीर, रोहिदासपुरा शेजारील जागा,
०४. कैलास नगर येथील आरोग्य वैद्यकीय दवाखान्याची जागा.

करीता, इत्यादी जागेवर महानगरपालिकेने व्यापारी संकुल बांधण्याची कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :-विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५५, भवानी नगर या प्रभागातील जुना मोंढा येथे असलेल्या महानगरपालिकेच्या जागेवर तसेच हरी मस्जिद शेजारील जागा, जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा शहागंज (जुना मोंढा), रोहिदास मंदीर, रोहिदासपुरा शेजारील जागा व कैलास नगर येथील आरोग्य वैद्यकीय दवाखान्याची जागा या जागांवर नियमाप्रमाणे महानगरपालिकेचे व्यापारी संकुल बांधण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य जयंती महोत्सव व धम्मदिक्षा षष्ठी समारंभा निमीत्ताने दिनांक १४ ऑक्टोंबर २०१६ रोजी जागतीक दर्जाचे “बुध्दिस्ट फेस्टिव्हल”चे आयोजन धम्मयाना एज्युकेशन व चॅरीटेबल ट्रस्ट व इंटरनॅशलन बुध्दिस्ट फेस्टिव्हल-२०१६ यांच्या संयुक्त विद्यमाने जाबिंदा लॉन्स्, बीडबाय पास, औरंगाबाद येथे करण्यात आलेले आहे.

सदरील फेस्टिव्हल आंतरराष्ट्रीय स्तरावरील असुन त्यास भारत सरकारातील व महाराष्ट्र शासनातील मंत्री तसेच विविध पक्षांचे लोकप्रतिनीधी उपस्थित राहणार आहेत. तसेच श्रीलंकेचे माजी राष्ट्रपती मा.महींद राजपक्षे व तेथील लोकप्रतिनीधी, राजदुत उपस्थित राहणार आहेत.

करीता, सदरील फेस्टिव्हलचे आंतरराष्ट्रीय महत्व लक्षात घेऊन महानगरपालिकेमार्फत या फेस्टिव्हलसाठी र.रु.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) ची मदत करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-** श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर :- विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य जयंती महोत्सव व धम्मदिक्षा षष्ठी समारंभानिमीत्ताने दिनांक १४ ऑक्टोंबर २०१६ रोजी जागतीक दर्जाचे “बुध्दिस्ट फेस्टिव्हल”चे धम्मयाना एज्युकेशन व चॅरीटेबल ट्रस्ट व इंटरनॅशलन बुध्दिस्ट फेस्टिव्हल-२०१६ यांच्या संयुक्त विद्यमाने जाबिंदा लॉन्स्, बीडबाय पास, औरंगाबाद येथे आयोजित केल्या जाणाऱ्या फेस्टिव्हलसाठी महानगरपालिकेतर्फे र.रु.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) ची नियमाप्रमाणे आर्थिक मदत करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणिसंग्रहालय मिटमिटा येथील गट क्र ३०७ मधील सरकारी गायरान जमिनीत हलवून सफारी पार्क तयार करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला असून, शासनास्तरावरुन सदरील जमीन महापालिकेस मिळणार आहे.

उपरोक्त ठिकाणी सफारी पार्क विकसित करण्यासाठी महानगरपालिकेस शासनाकडून भरीव निधी मिळावा यासाठी ठराव पारीत करुन शासनाकडे पाठविण्यात यावा.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक :- श्री. राजेंद्र जंजाळ अनुमोदक :- श्री.मोहन मेघावाले

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येणारे सिध्दार्थ उद्यान येथील प्राणिसंग्रहालय मिटमिटा येथील गट क्र ३०७ मधील सरकारी गायरान जमिनीत हलवून सफारी पार्क तयार करण्यासाठी शासनाकडून मिळणाऱ्या जमिनीवर सफारी पार्क विकसित करण्यासाठी शासनाने भरीव निधी महानगरपालिकेस मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३२,आंबेडकर नगर-जाधववाडी या वार्डात शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत या वॉर्डातील खालील विकास कामांचा समावेश करणे बाबत.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | र.रु.लक्षमध्ये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मधील गल्ली नं.७ मध्ये सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मधील गल्ली नं.१२ मध्ये सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मधील गफुरभाई यांच्या घरापासून ते अनिता मोकळे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ४. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मधील सोनवणे यांच्या रेशन दुकानापासून ते गफुरभाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मध्ये जागो-जागी नवीन पाण्याची पाईप लाईन टाकणे. | १५ लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी गल्ली नं.९ मध्ये सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| ७. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते दांडगे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| ८. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मध्ये जागो-जागी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | ०५ लक्ष |
| | **एकुण** | **८० लक्ष** |

सदरील विकास कामांच्या संदर्भाने स्वतंत्ररित्या परिपुर्ण प्रस्तावास तांत्रिक मान्यता व परिपत्रकानुसार तसेच अंदाजपत्रकीय तरतुदींसह आवश्यक कागदपत्रांसह मा.जिल्हाधिकारी महोदय यांच्याकडे प्रस्ताव मंजुर करून पाठविण्याच्या कार्यवाहीस्त व मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती भारती महेंद्र सोनवणे **अनुमोदक:-** श्रीमती विजया संजय बनकर

मा.महापौर :- विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३२, आंबेडकर नगर-जाधववाडी या वार्डात शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विविध विकास कामे करण्यासाठी स्वतंत्ररित्या परिपुर्ण प्रस्तावास तांत्रिक मान्यता व परिपत्रकानुसार तसेच अंदाजपत्रकीय तरतुदींसह आवश्यक कागदपत्रांसह निधी मिळणे करीता प्रस्ताव जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | र.रु.लक्षमध्ये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मधील गल्ली नं.७ मध्ये सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मधील गल्ली नं.१२ मध्ये सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मधील गफुरभाई यांच्या घरापासून ते अनिता मोकळे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मधील सोनवणे यांच्या रेशन दुकानापासून ते गफुरभाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मध्ये जागो-जागी नवीन पाण्याची पाईप लाईन टाकणे. | १५ लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी गल्ली नं.९ मध्ये सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| ७. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते दांडगे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड बनवणे. | १० लक्ष |
| ८. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर-जाधववाडी मध्ये जागो-जागी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | ०५ लक्ष |
| | **एकुण** | **८० लक्ष** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ६१३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ मध्ये स्थायी समितीने शिफारस केलेले SCR WARD B-P-No. 17 वर दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| P.No. 17 | अ.क्र. ७ | वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर एन-१२ अंतर्गत नामांतर कॉलनी येथील ड्रेनेज लाईन बदलणे र.रु.१० लाख रुपये |

नामांतर कॉलनी मध्ये ड्रेनेज लाईनचे काम झालेले आहे.

त्याऐवजी वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर एन-१२ अंतर्गत सी-सेक्टर,जी-सेक्टर,डी-सेक्टर, एच-सेक्टर मध्ये ड्रेनेज लाईनचे चोक-अपचे प्रमाणे वाढले आहे. मेन होल तुटलेले आहेत.

त्याऐवजी खालील ड्रेनेजलाईनचे काम करणे अत्यंत आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| | | वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर एन-१२ अंतर्गत सी-सेक्टर,जी-सेक्टर,डी-सेक्टर, एच-सेक्टर येथील ड्रेनेज लाईन बदलणे र.रु.१० लाख रुपये |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सिमा गणपत खरात **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :- विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सन २०१६-१७ मध्ये स्थायी समितीने शिफारस केलेले SCR WARD B-P-No. 17 वर दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| P.No. 17 | अ.क्र. ७ | वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर एन-१२ अंतर्गत नामांतर कॉलनी येथील ड्रेनेज लाइन बदलणे र.रु.१० लाख रुपये |

**त्याऐवजी**

| | | |
|---|---|---|
| | | वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर एन-१२ अंतर्गत सी-सेक्टर,जी-सेक्टर,डी-सेक्टर, एच-सेक्टर येथील ड्रेनेज लाईन बदलणे र.रु.१० लाख रुपये |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ६१४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोडवरील मोंढा नाका येथे उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलास सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२, दिनांक २०.०६.२०१५ अन्वये “छत्रपती संभाजी राजे उड्डाणपुल” असे नाव देण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे खालील दर्शविल्याप्रमाणे चौक व रस्त्यांना नावे देण्यात यावी.

१. गुरूद्वारा श्री गुरू तेग बहादुर लंगर साहेब मार्ग,
२. संत कंवरराम चौक,
३. कल्पतरु श्री.१००८ कुंथुनाथ खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर बालाजीनगर मार्ग,
४. युगप्रवर्तक १००८ श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर अरिहंतनगर मार्ग.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

**अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ, श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :- विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १) गुरूद्वारा श्री गुरू तेग बहादुर लंगर साहेब मार्ग, २) संत कंवरराम चौक, ३) कल्पतरु श्री.१००८ कुंथुनाथ खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर बालाजीनगर मार्ग व ४) युगप्रवर्तक १००८ श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर अरिहंतनगर मार्ग अशी नावे नियमानुसार देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील लक्ष्मी कॉलनी, सम्राट अशोकनगर, पहाडसिंगपुरा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि परिसर, औरंगाबाद विद्यापीठ बुध्द लेणी प्रबुध्दनगर,कुतुबपूरा, जयभिमनगर,बेगमपुरा,मिलींद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, पडेगाव,नंदनवन कॉलनी, निसर्ग कॉलनी या सर्व परिसरात साठ टक्क्यांच्या वर दलित मागासवर्गीय नागरीकांचे वास्तव्य आहे. बीबी का मकबरा,पाणचक्की,बुध्दलेणी या ऐतिहासिक स्थळांमुळे या भागात मोठ्या प्रमाणात देशी-विदेशी पर्यटक यांचे येणे-जाणे करतात. याच परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मिलिंद कॉलेज, आंबेडकर कॉलेज, आंबेडकर लॉ कॉलेज, होलीक्रॉस मराठी शाळा, पीईएस इंजिनीअर कॉलेज, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, दंत महाविद्यालय या महत्वाच्या शैक्षणिक संस्था आहेत. तसेच शासकीय घाटी रुग्णालय, पार्वती हॉस्पीटल आहे. या सर्व संस्थांमध्ये दररोज हजारो नागरीक कार्यालयीन आणि दैनंदिन कामाकरीता जाणे येणे करतात.

या भागात दळणवळण करीता निजाम कालीन, मकई गेट, पाणचक्की गेट, बारापुल्ला गेट, यातूनच येणे-जाणे करावे लागते. या पुलांचे आयुष्य संपलेले आहे. हे पुल केव्हाही कोसळून महाड येथील सावित्री नदी पुलासारखी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

गेल्या पन्नास वर्षात उपरोक्त परिसराची लोकसंख्या अनेक पटीने वाढली आहे. दररोज लाखो वाहने या पुलावरून आणि मार्गवरुन येणे जाणे करतात. सायंकाळी व दिवसभरात केव्हाही वाहतूक कोंडी होऊन नागरीकांना चार पाच तास ताटकळत बसावे लागते. आजच्या परिस्थितीत सदरील गेट आणि पुल अत्यंत अरुंद झाले आहे. मराठवाड्यातील सर्वात मोठे घाटी शासकीय रुग्णालय याच भागात आहे. मराठवाड्यातून अनेक गंभीर रुग्ण उपचार घेण्याकरीता या रुग्णालयात येतात. वाहतुक कोंडीमुळे रुग्णांना रुग्णालयात नेता येणे अशक्य बनते. अनेक रुग्ण रस्त्यातच दगावले आहेत. विद्यार्थ्यांना वेळेत परिक्षेला जाता येत नाही. रस्त्यांअभावी दलित वस्तीचा विकास खुंटला आहे. पर्यटकांना आपल्या शहराची महाराष्ट्राची नाचक्की होते. या सर्व प्रश्नांचा गांभीर्याने विचार करून उपरोक्त पुलांचे नवनिर्माण व रुंदीकण करावे. नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत सदरील कामाचे प्रस्ताव व अंदाजपत्रक तयार करून ते शासनाकडे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करीता सर्व साधारण सभेमध्ये मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**सुचक:-**श्री.चेतन जनार्धन कांबळे **अनुमोदक:-**श्री.कचरु छगनराव घोडके.

मा.महापौर : विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, निजाम कालीन, मकई गेट, पाणचक्की गेट, बारापुल्ला गेट, यातूनच अनेक भागातील नागरीकांना येणे-जाणे करावे लागते. तसेच या पुलांचे आयुष्य संपलेले असल्याने या पुलांचे नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत नवनिर्माण व रुंदीकरण करण्याकरीता कामाचे अंदाजपत्रक

तयार करून ते शासनाकडे निधी उपलब्धतेसाठी प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

(१) सन २०१६-१७ च्या बजेट बुकमध्ये अ.क्र.१, वॉर्ड क्र.५२ मुख्य डी.पी.रस्त्यावर पुनर्डांबरीकरण करणे (SCR-WARD-A.P.NO.१ (३० लक्ष) त्या ऐवजी वॉर्ड क्र.५२ येथील मुख्य डि.पी.रस्त्याचे काँक्रेटीकरण करणे व गटार बांधणे.

(२) अ.क्र.२, वॉर्ड क्र.५२ अंतर्गत रस्त्यावर पुनर्डांबरीकरण करणे SCR-WARD-A.P.NO.१ (२० लक्ष) त्या ऐवजी वॉर्ड क्र.५२ अंतर्गत ड्रेनेज लाईन नविन व दुरुस्ती करणे व पददिवे लावणे व दुरुस्ती करणे व फुटकळ कामे करणे.

**सुचक:-** श्री.विकास प्रकाश एडके **अनुमोदक:-** श्रीमती सरीता अरुण बोर्डे

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,

(१) सन २०१६-१७ च्या बजेट बुकमध्ये अ.क्र.१, वॉर्ड क्र.५२ मुख्य डी.पी.रस्त्यावर पुनर्डांबरीकरण करणे (SCR-WARD-A.P.NO.१ (३० लक्ष) त्या ऐवजी वॉर्ड क्र.५२ येथील मुख्य डि.पी.रस्त्याचे काँक्रेटीकरण करणे व गटार बांधण्यास तसेच

(२) अ.क्र.२, वॉर्ड क्र.५२ अंतर्गत रस्त्यावर पुनर्डांबरीकरण करणे SCR-WARD-A.P.NO.१ (२० लक्ष) त्या ऐवजी वॉर्ड क्र.५२ अंतर्गत ड्रेनेज लाईन नविन व दुरुस्ती करणे व पददिवे लावणे व दुरुस्ती करणे व फुटकळ कामे करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात क्रांतीचौक हे स्थळ नेहमी क्रांतीस्थळ म्हणुन या शहरात प्रसिध्द आहे. अनेक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, दलित कष्टकरी, शेतमजुर, कामगार यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी अनेक संघर्ष, धरणे, आंदोलने, मोर्चे याची साक्ष हे क्रांतीस्थळ देते, ज्याने शुन्यातुन संपूर्ण हिंदुस्थान काबीज केला अशा अष्टपैलू, बलशाही, महायोध्दा, महाधीपती, रयतेचा जाणता राजा, आपल्या तळपत्या तलवारीच्या जोरावर सुलतानशाही, मुगलशाही, आदिलशाही, निजामशाहीला जरजर करुन खरे रयतेचे राज्य स्थापन केले. अशा महान छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ डौलदार पुतळा उभारला. यामुळे या शहराचे सौंदर्य अधिकच फुलले होते. परंतु सध्या या पुतळ्याकडे पाहतांना शरमेने मान खाली जाते, पुतळ्याची अवस्था व सौंदर्यीकरण पाहता मन खिन्न होते. परंतु या दुरावस्थेकडे आपले लक्ष जात नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

तरी आपण कर्तृत्वावान महाराजांच्या पुतळ्याला सन्मानजनक सौंदर्यीकरण करुन व त्याची उंची वाढवून शहराच्या सौंदर्यीकरणात भर घालावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-** श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर : विषय मंजुर. प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात क्रांतीचौक येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ डौलदार पुतळ्याचे सौंदर्यीकरण करुन त्याची उंची वाढविण्यासाठी कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रोपळेकर चौकापुढील चौकात स्टेट बँक ऑफ हैद्राबाद जवळील चौकात नेहमीच वाहतुक कोंडी होत असते या चौकात शहानुरमिया दर्गाकडुन अमरप्रितकडे जाणारे तसेच ज्योतीनगर कडून येणारे व रोपळेकर हॉस्पीटलकडून साताराकडे जाणाऱ्या वाहनांची गर्दी जास्त असते त्यामुळे या चौकात वाहतुक सिग्नल बसविणे अत्यावश्यक झालेले आहे. तरी या चौकात तात्काळ वाहतुक सिग्नल बसविण्यात यावा.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ **अनुमोदक:-** श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :- विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रोपळेकर चौकापुढील चौकात स्टेट बँक ऑफ हैद्राबाद जवळील चौकात नेहमीच वाहतुक कोंडी होत असते या चौकात वाहतुक सिग्नल बसविण्या करीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील कामांचे लेखाशिर्षक रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| Ward-F-Spill Page No.54 | ३ | वॉर्ड क्र.६८, मित्रनगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्ण डांबरीकरण, तरतुद र.रु.२२.९५ लक्ष | मित्रनगर, विष्णुनगर येथील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे. तरतुद र.रु.२२.९५ लक्ष |
| Layout New Work Page No.11 | १२ | विनया अपार्टमेंट ते नरसीकर यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, तरतुद र.रु. १० लक्ष | मित्रनगर, विष्णूनगर येथील विविध ठिकाणी स्ट्रॉम वॉटर लाईन व रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे, तरतुद र.रु.१० लक्ष. |
| Layout New Work Page No.11 | १३ | शांता अपार्टमेंट ते मराठा दरबार हॉटेल पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. तरतुद र.रु.२० लक्ष | मित्रनगर, विष्णुनगर येथील विविध ठिकाणी जलनि:स्सारण वाहिनी दुरूस्त करणे व नवीन लाईन टाकणे. तरतुद र.रु.२० लक्ष |
| SCR-Ward F P.No.52 | ०६ | विष्णुनगर अंतर्गत विविध ठिकाणी ऊर्जाबचत पथदिवे लावणे व दुरूस्ती करणे. तरतुद र.रु.१० लक्ष | मित्रनगर येथील विविध उद्याने विकसीत व सुशोभिकरण करणे. तरतुद र.रु.१० लक्ष |
| GBR-Ward F P.No. 09 | ०१ | सिंधी कॉलनी समिती मैदान येथे हायमास्ट लावणे. तरतुद र.रु.५ लक्ष | मित्रनगर, विष्णुनगर येथील विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉकची दुरूस्ती करणे व नवीन पेव्हर ब्लॉक बसविणे. तरतुद र.रु.५ लक्ष |

**सुचक:-**श्रीमती अंकिता अनिल विधाते **अनुमोदक:-**श्रीमती अनिता मोहन साळवे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| Ward-F-Spill Page No.54 | ३ | वॉर्ड क्र.६८, मित्रनगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्ण डांबरीकरण, तरतुद र.रु.२२.९५ लक्ष | मित्रनगर, विष्णुनगर येथील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे. तरतुद र.रु.२२.९५ लक्ष |
| Layout New Work Page No.11 | १२ | विनया अपार्टमेंट ते नरसीकर यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, तरतुद र.रु. १० लक्ष | मित्रनगर, विष्णूनगर येथील विविध ठिकाणी स्ट्रॉम वॉटर लाईन व रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे, तरतुद र.रु.१० लक्ष. |
| Layout New Work Page No.11 | १३ | शांता अपार्टमेंट ते मराठा दरबार हॉटेल पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. तरतुद र.रु.२० लक्ष | मित्रनगर, विष्णुनगर येथील विविध ठिकाणी जलनि:स्सारण वाहिनी दुरूस्त करणे व नवीन लाईन टाकणे. तरतुद र.रु.२० लक्ष |
| SCR-Ward F P.No.52 | ०६ | विष्णुनगर अंतर्गत विविध ठिकाणी ऊर्जाबचत पथदिवे लावणे व दुरूस्ती करणे. तरतुद र.रु.१० लक्ष | मित्रनगर येथील विविध उद्याने विकसीत व सुशोभिकरण करणे. तरतुद र.रु.१० लक्ष |
| GBR-Ward F P.No. 09 | ०१ | सिंधी कॉलनी समिती मैदान येथे हायमास्ट लावणे. तरतुद र.रु.५ लक्ष | मित्रनगर, विष्णुनगर येथील विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉकची दुरूस्ती करणे व नवीन पेव्हर ब्लॉक बसविणे. तरतुद र.रु.५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती मयुरी मारुती इंगळे या सहशिक्षिका या पदावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गुहागर, जि.रत्नागिरी येथे कार्यरत आहेत. त्यांचे पती श्री.सचिन गायकवाड हे औरंगाबाद महानगरपालिकेत सहशिक्षक या पदावर कार्यरत आहेत.

करीता, श्रीमती मयुरी मारुती इंगळे, सहशिक्षिका यांना पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेत सहशिक्षिका या पदावर लवकरात लवकर सामावून घेण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती मयुरी मारुती इंगळे, सहशिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गुहागर, जि.रत्नागिरी यांना पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेत सहशिक्षिका या पदावर नियमाप्रमाणे सामावून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती पी.पी.पारनेरे या सहशिक्षिका या पदावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्रीकृष्णनगर, केंद्र जामवाडी ता.जि.जालना येथे कार्यरत आहेत. त्यांच्या मणक्यात गॅप असल्यामुळे वैद्यकीय सेवेच्या दृष्टिने व सततचा प्रवास टाळण्यासाठी त्यांनी पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत महानगरपालिकेत सामावून घेण्यासाठी दिनांक १२.०१.२०१२ रोजी प्रस्ताव दिलेला आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जालना यांनी श्रीमती पारनेरे यांच्या जिल्हा बदली प्रस्तावास ना-हरकत प्रमाणपत्र मा.आयुक्त महानगरपालिका यांच्या नावे दिनांक १४.०३.२०१३ रोजी दिलेले आहे. सर्व कायदेशीर कागदपत्रांची पुर्तता करूनही त्यांना महानगरपालिकेत आंतर जिल्हा बदलीने सामावून घेण्यात आलेले नाही. त्यांच्यानंतर काही शिक्षकांना या निकषावर महानगरपालिकेत सामावून घेण्यात आलेले आहे. या संदर्भात त्यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.९३३८/२०१४ अन्वये दाद मागितली आहे.

करीता, श्रीमती पारनेरे, सहशिक्षिका यांच्या वैद्यकीय कारणांचा विचार करून तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशा अन्वये पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत त्यांना औरंगाबाद महानगरपालिकेत सहशिक्षिका या पदावर लवकरात लवकर सामावून घेण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-** श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती पी.पी.पारनेरे, सहशिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्रीकृष्णनगर, केंद्र जामवाडी, ता.जि.जालना यांना पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेत सहशिक्षिका या पदावर नियमाप्रमाणे सामावून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र-७४ येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते राजश्री शाहू विद्यालयापर्यंत रस्त्यांचे कॉंक्रेटिंग करणे बाबतच्या रक्कम रुपये ४०,२३,६२०.०० एवढ्या रकमेच्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून प्राप्त झालेल्या निविदा दरास मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक-१५३/२०१४ दिनांक ११.०२.२०१४ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. सद्यस्थितीत कॉंक्रेटिकरणाचे काम अंतिम टप्प्यात असून प्रभागाचे स.नगरसेवक आणि स्थानिक रहिवाशी यांनी उर्वरित कामे तातडीने पुर्ण करण्याची मागणी केलेली आहे. सदरची कामे पुर्ण करण्यासाठी रक्कम रुपये १६.०० लक्ष एवढ्या वाढीव रकमेची आवश्यकता आहे.

त्या अनुषंगाने सदरील कामाचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये ५५,६८,३०३.०० चे तयार करण्यात आलेले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता प्राप्त आहे. सदरील कामाचा खर्च हा नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षामधुन भागविण्यात येईल. तरी सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये ५५,६८,३०३.०० चा प्रस्ताव (रक्कम रुपये १६.०० लक्ष एवढ्या वाढीव रकमेसह) याच कामाचे कंत्राटदार मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचेकडून निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र-७४ येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते राजश्री शाहू विद्यालयापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रेटिंग करण्याच्या कामाचे रक्कम रुपये ५५,६८,३०३.०० (रक्कम रुपये १६.०० लक्ष एवढ्या वाढीव रकमेसह) च्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येऊन सदरील काम याच कामाचे कंत्राटदार मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचेकडून निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये वॉर्ड क्र.१० रोजेबाग अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलणे आवश्यक आहे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसकंल्प सन २०१६-१७ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.१०, रोजेबाग,सिध्दार्थ नगर, श्री.उस्मान टेलर यांच्या घरापासुन बुध्दविहारापर्यंत रस्त्याचे कॉंक्रेटिकरण करणे. र.रु.१०.०० लक्ष. पान क्र.एससीआर P.No.११ अ.क्र.६ | वॉर्ड क्र.१०, रोजेबाग येथे विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१०.०० लक्ष |

**सुचक:-**श्री.मोहन धन्नुलाल मेघावाल **अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये वॉर्ड क्र.१० रोजेबाग अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते

| अ.क्र. | अर्थसकंल्प सन २०१६-१७ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.१०, रोजेबाग,सिध्दार्थ नगर, श्री.उस्मान टेलर यांच्या घरापासुन बुध्दविहारापर्यंत रस्त्याचे कॉंक्रेटिकरण करणे. र.रु.१०.०० लक्ष. पान क्र.एससीआर P.No.११ अ.क्र.६ | वॉर्ड क्र.१०, रोजेबाग येथे विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१६-१७ वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष परिसरातील नागरीकांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. पान क्र. | जुन कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| Pro-Poor Budget New पान क्र.१, अ.क्र.८ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव स्लम अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. आर्थिक तरतुद १०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत पोलिस कॉलनी येथे संरक्षित भींत बांधणे व विविध विकास कामे करणे. गट नं.४४ मध्ये | १०.०० लक्ष |

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजी शेजवळ **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१६-१७ वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष परिसरातील नागरीकांच्या सुविधेसाठी बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. पान क्र. | जुन कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| Pro-Poor Budget New पान क्र.१, अ.क्र.८ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव स्लम अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. आर्थिक तरतुद १०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत पोलिस कॉलनी येथे संरक्षित भींत बांधणे व विविध विकास कामे करणे. गट नं.४४ मध्ये | १०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यानी घोषीत केले.

(अपर्णा थेटे)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - [२८]

**मंगळवार दिनांक २०.०९.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.पालिका सदस्य श्री.सय्यद मतीन रशीद (प्रभाग क्रमांक-२०)**

**उत्तर:- उपअभियंता (वॉर्ड-१), महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ६१२ | टाऊन हॉल उड्डाण पुलाखाली साचणाऱ्या पावसाच्या पाण्याचे काम केव्हा सुरू होणार? याचा खुलासा करावा. | टाऊनहॉल उड्डाण पुलाखाली साचणाऱ्या पाण्याचा निचरा होण्याकरीता महानगरपालिकेच्या टप्पा क्र.०१ व टप्पा क्र.०३ च्या मधुन ९०० मी.मी.व्यासाच्या पाईप टाकुन पाण्याचा निचरा करण्याचे प्रस्तावित आहे. त्या करीता रक्कम रु.९०.०० लक्षचे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर करण्यात आले आहे. |
| ६१३ | टाऊन हॉल ते मकाईगेट पर्यंत असलेल्या १०० फुटाच्या रोडवर डिव्हाईडर केव्हा बनवणार? | टाऊनहॉल ते मकाईगेट रस्त्यावरील दोन्ही बाजुच्या काही बाधीत मिळकतीचे विकास योजना रस्त्यानुसार भुसंपादन झालेले नाही. काही मिळकतीचे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्यामुळे डिवाईडर टाकण्यास रस्त्याची पुर्ण रुंदी मिळत नसल्याने डिवाईडरचे काम अद्याप करण्यात आलेले नाही. भुसंपदानाचे काम पुर्ण होताच डिवाईडर टाकणेबाबत कार्यवाही करण्यात येईल. |
| ६१६ | वार्ड क्र.२० येथे कनिष्ठ अभियंता नाही. त्यामुळे कामे प्रलंबित आहे. खुलासा करावा. | वॉर्ड क्र.२० करीता श्री.एन.काटकार, शा.अ.यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. |

**प्रश्न क्रमांक ६१४:-**

वार्ड क्र.२० मध्ये औषधी फवारणी का होत नाही?

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक ६१५:-**

प्रत्येक सर्वसाधारण सभेसाठी विद्युत खर्च किती येतो?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (विद्युत), महानगरपालिका औरंगाबाद.**

प्रत्येक सर्वसाधारण सभेसाठी प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात प्रसंगानुरुप लाईटची, कुलींग सिस्टीमची, ध्वनी व्यवस्थेची व्यवस्था करण्यात येते. प्रशासकीय इमारती करीता एकच विजेचे मिटर असल्याने सभागृहातील स्वतंत्र विद्युत खर्च काढणे शक्य नाही. ध्वनी व्यवस्थे करिता तुर्त रु.४६०००/- खर्च येतो.

**स.पालिका सदस्य श्री. गायकवाड कैलास लक्ष्मण (प्रभाग क्रमांक-११३)**

**प्रश्न क्रमांक ६१७ ते ६१९:-**

**उत्तर:- उपआयुक्त (प्रशासन), महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ६१७ | महानगरपालिकेने सुरु केलेल्या इयत्ता ८ वी च्या वर्गाला केव्हा मान्यता घेण्यात | सर्वप्रथम इंडस प्रकल्पांतर्गत सन २००७-०८ मध्ये प्रा.शा.मुकूंदवाडी व प्रा.शा.मिटमिटा येथे इयत्ता ८ वी चा |

| | | |
|---|---|---|
| | आली आहे? त्याची छायांकित प्रत देण्यात यावी. एकुण किती माध्यमिक शाळा महानगरपालिकेतर्फे चालविल्या जातात? त्यांची एकुण तुकड्याची संख्या किती आहे? तसेच विद्यार्थी संख्या किती आहे? इयत्ता ८ वी चा वर्ग सुरु झाल्यानंतर कायदेशीर सर्व मान्यता घेण्यात आल्या आहेत काय? | वर्ग उघडण्यास परवानगी मिळाली आहे. शासन निर्णय क्र.नमाशा २००९/(४९७/०९) माशि-१, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ११.०६.२००९ नुसार महानगरपालिकेच्या १२ माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेली आहे. सोबत प्रत देत आहे.<br>सद्यस्थितीत महानगरपालिका औरंगाबाद तर्फे एकूण १२ माध्यमिक शाळा चालविल्या जातात. एकुण विद्यार्थि संख्या १५२७ इतकी आहे. साधारण २७ तुकड्या आहेत. |
| ६१८ | इयत्ता ८ वी १० वी विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी प्रशिक्षीत (पदवी) प्राप्त बी.एड.एकुण शिक्षक किती आहे? ते तात्पुरत्या स्वरुपात आहे की कायम आहे? नियमाप्रमाणे एका तुकडीला किती शिक्षक आवश्यक आहे. आवश्यक तितके शिक्षक आपल्याकडे उपलब्ध आहे काय? नसल्यास आपण माध्यमिक शाळा सुरु केल्यापासून शासनाला पाठपुरावा केला आहे काय? त्याची माहिती द्यावी. | सद्यस्थितीत एकुण ४६ घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत आहेत. एका तुकडीस साधारणतः १.५ शिक्षक अनुज्ञेय आहे. इयत्ता ८ वीचा वर्ग हा प्राथमिक शाळेला जोडण्यात आला आहे. सन २०१५-२०१६ ची संचमान्यता झाल्यानंतर आवश्यक शिक्षकांची संख्या उपलब्ध होईल.<br>संचमान्यतेकरीता प्रकरण शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद औरंगाबाद यांचेकडे सादर करण्यात आले आहे. तसचे त्याबाबत पाठपुरावाही केला जात आहे. |
| ६१९ | याबाबत काय अडचणी आहेत? या मा.सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणुन दिले काय? | संचमान्यता प्राप्त झाल्यानंतर जर अतिरीक्त शिक्षकांची आवश्यकता असेल तर प्रकरण मा.सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यात येईल. |

**प्रश्न क्रमांक ६२०:-**

पार्किंग बाबत मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचीका क्र.५००९/२००१ च्या आदेशानुसार नागरिकांना किंवा सदनिकाधारकांनी किंवा घर मालकांनी पार्किंग मधील अतिक्रमणे काढणे बाबत तक्रारी किती प्राप्त झाल्या आहे? व त्या अनुषंगाने किती जागा पार्किंग साठी मोकळ्या करण्यात आल्या आहेत? याबाबत अहवाल आज घडीला मा.उच्च न्यायालयात देण्यात आला आहे काय? या बाबतची माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- विधी सल्लागार, महानगरपालिका औरंगाबाद.**

पार्किंग बाबत मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.५००९/२००१ च्या आदेशानुसार नागरीकांनी किंवा सदनिका धारकांनी किंवा घर मालकांनी पार्किंग मध्ये अतिक्रमणे काढणे बाबत तक्रारी संदर्भाने सन २००९ पर्यंत सहाय्यक संचालक नगर रचना व प्रशासकीय विभाग यांनी आपल्या विभागाच्या स्तरावरुन मा.उच्च न्यायालयात अहवाल सादर केला आहे.

**उत्तर:- उपआयुक्त (अतिक्रमण),महानगरपालिका औरंगाबाद.**

प्रस्तुत प्रकरणात मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र.५००९/२००१ च्या आदेशाचा संदर्भ नमुद करुन पार्किंगमधील अतिक्रमणाबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही. तथापी, मागील सहा महिन्यात स्थानिक नागरीकांच्या पार्किंगमधील अतिक्रमणाच्या एकूण २७ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी १३ तक्रारीवर कार्यवाही पूर्ण करण्यात येऊन पार्किंग मोकळी करण्यात आली आहे. उर्वरीत १४ तक्रारी कार्यवाही अंतर्गत आहे. मा.उच्च न्यायालयात अहवाल सादर केल्याबाबतचा खुलासा विधी विभागाकडुन मिळणे अपेक्षीत आहे.

**स.पालिका सदस्य श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे (प्रभाग क्रमांक-८६)**

**प्रश्न क्रमांक ६२१ :-**

औरंगाबाद शहरात एलईडी लाईट लावणे संदर्भात मा.सुप्रिम कोर्टाने काय निर्णय दिला? त्याची संपूर्ण माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (विद्युत), महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद मध्ये एल.ई.डी. लावण्या संदर्भात मा.सुप्रिम कोर्टाने Revised Work Order करणे करिता निर्णय दिला आहे. निर्णयाची प्रत विधी विभागाकडे असुन पत्र देवून त्यांना कळविण्यात आलेले आहे.

**उत्तर:- विधी सल्लागार, महानगरपालिका औरंगाबाद.**

एल.ई.डी.प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. दि.१९.११.२०१५ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने SLP No.३४१२९-३४१३०/२०१४ या प्रकरणात जाहिरातीचे अधिकार वगळून देण्यात आलेले कार्यदेश अंशत:वैध ठरवले होते.

**प्रश्न क्रमांक ६२२:-**

महानगरपालिकेने एलईडी लाईट संदर्भात कोर्टात दाखल केलेल्या याचीकेवर आज पावेतो एकुण किती खर्च आला?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (विद्युत), महानगरपालिका औरंगाबाद.**

सदरील बाब ही विधी विभागाशी संबंधीत असून त्यांना त्याबाबत पत्र देवून कळविण्यात आलेले आहे.

**उत्तर:- विधी सल्लागार, महानगरपालिका औरंगाबाद.**

महानगरपालिकेतर्फे एल.ई.डी.प्रकरणात I.A. आणि Review दाखल करण्यात आला असून याबाबत वकिलांची फीस देय आहे.

**प्रश्न क्रमांक ६२३:-**

एलईडी संदर्भात प्रकरण कोर्टात सादर करण्यापूर्वी मनपा प्रशासनाने प्राथमिक तयारी केली होती काय? सदरील प्रकरण कोर्टात सादर करण्यापुर्वी किंवा ठराव रद्द करण्यापूर्वी मा.सर्वोच्च न्यायालयास योग्य ती माहिती दिली होती का? दिली नसल्यास त्याचे कारण काय?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (विद्युत), महानगरपालिका औरंगाबाद.**

सदरील बाब हि विधी विभागाशी संबंधीत असून त्यांना त्याबाबत पत्र देवून कळविण्यात आलेले आहे.

**उत्तर:- विधी सल्लागार, महानगरपालिका औरंगाबाद.**

एल.ई.डी. प्रकरणत मनपा प्रशासनाने प्राथमिक तयारी केली होती I.A. दाखल करण्याची तयारी झाली होती तथापी, दि.२०.०२.२०१६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.३४० कारणापुरता उतारा दि.३१.०३.२०१६ रोजी प्राप्त झाला. त्याप्रमाणे त्याची प्रतीसह दि.०१.०४.२०१६ रोजी दिल्ली येथे प्रकरणातील मनपा पॅनलवरील वकील श्री.अनिरुध्द मयी यांचेकडे मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकरण दाखल करणेकरीता भेट घेण्यात आली होती. याबाबत अंतिम मसुदा तयार झाला होता, केवळ प्रकरण दाखल करण्याची औपचारीकता कारणापुरता उताऱ्या अभावी बाकी होती. परंतु तत्पुर्वीच दि.२६.०४.२०१६ रोजी अवमान याचीका संबंधीतांनी दाखल केली होती. यामध्ये दि. ०१.०४.२०१६ रोजी तत्कालीन आयुक्त श्री.केंद्रेकर आणि मा.स्थायी समितीचे सदस्यांना नोटीस तामील करण्याचे आदेश पारीत झाले. या पार्वश्वभुमीवर प्रकरणातील वकीलांच्या सल्ल्यानुसार प्रथम अवमान याचिकेमध्ये मनपाचे म्हणने सादर करण्याचे आणि मा.न्यायालयाची परवानगी घेणेबाबत

झालेल्या ठरावाची माहिती देणे आणि त्यानुषंगाने प्राप्त आदेशाप्रमाणे दाखल करावयाचा I.A. चा निर्णय घेण्याचे ठरले.

या बाबत अवमान याचिका प्रलंबीत असतांनाच दि.२६.०७.२०१६ रोजी I.A. दाखल करण्यात आला तद्नंतर न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे दि.१६.०८.२०१६ रोजी Review देखील दाखल करण्यात आला.

**<u>प्रश्न क्रमांक ६२४:-</u>**

सध्या महानगरपालिका प्रतिमहा एलईडीसाठी रु.२.२५ कोटी अदा करु शकते का? महानगरपालिकेची तशी परिस्थिती आहे काय? नसल्यास मनपाची आर्थिक परिस्थिती सुधारे पर्यंत काम सुरु न करण्याचे आदेश अथवा पुढील कार्यवाही मनपा करुन शकते काय?

**<u>उत्तर:- विधी सल्लागार, महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१९.११.२०१५ रोजीच्या निर्णयामध्ये बदल झाल्यावरच प्रकल्पाच्या अंमलबजावणी बाबतचा निर्णय प्रलंबीत अथवा बदलता येईल.

**<u>उत्तर:- कार्यकारी अभियंता (विद्युत), महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

प्रतिमहा देयक करारानुसार अदा करावे लागेल. सुधारीत अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येईल.

**<u>स.पालिका सदस्य श्री.खान इरशाद इब्राहिम (प्रभाग क्रमांक-४१)</u>**

**<u>प्रश्न क्रमांक ६२५:-</u>**

सर्वे न.१० जसवंतपुरा येथील जागा कोणत्या वर्षी किती संपादित करण्यात आलेली होती व त्याचा किती मोबदला कोणाला देण्यात आला? या बाबत केलेल्या भुसंपादनाची वर्षनिहाय सविस्तर माहिती लेखी खुलासा करून देण्यात यावी.

**<u>उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

सर्व्हे नं.१० जसवंतपुरा औरंगाबाद येथील विकास योजना प्रस्तावाने बाधित जमीनी बाबत १९८५ साली खाजगी वाटाघाटीने २ हेक्टर ३५ गुंठे जमिन संपादीत करण्यात आली. तथापि, या बाबत प्रकरण न्यायाप्रविष्ठ झाले. या नंतर महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभा दिनांक १८/०१/१९९९ विषय क्र.२०३/४ मधील ठरावानुसार जमीन मालक व महानगरपालिका यांच्यातील तडजोडीने एकुण क्षेत्र ३ एकर १७.६ गुंठे नोंदणीकृत हक्कसोड पत्राद्वारे रितसर ताब्यात घेण्यात आले आहे. या तडजोडी अन्वये मोबदल्याचा वाद संतुष्टात आल्याचे संदर्भीय ठराव व उपलब्ध अभिलेखातुन दिसून येते.

**<u>स.पालिका सदस्या श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी (प्रभाग क्रमांक-२४)</u>**

**<u>प्रश्न क्रमांक ६२६:-</u>**

वार्ड क्र.२४, शहाबाजार येथे चेलिपुरा पोलीस चौकी ते चंपा चौक पर्यंत रस्ता रुंदीकरणामध्ये येणाऱ्या मिळकत धारकांनी रस्त्या मध्ये बाधीत होणाऱ्या मिळकतींचा मोबदला घेऊन आजपर्यंत ताबा दिला नाही व पुन्हा ताबा करुन अतिक्रमण केले. अशा ठिकाणी नगर रचना विभागाकडुन मार्किंग करुन कधी ताबा परत घेणार?

**<u>उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

रस्त्यावरील अतिक्रमणे दुर करणे ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून, प्रशासकीय विभागाने सदरील रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याच्या कार्यक्रमाचे नियोजन केल्यास या विभागाचा प्रतिनिधी जागेवर हजर राहील. प्रशासकीय विभाग व नगर रचना विभाग संयुक्तपणे लवकरच ही कार्यवाही पूर्ण करेल.

**प्रश्न क्रमांक ६२७:-**

वार्ड क्र.२४, शहाबाजार येथे औरंगाबाद टाईम्स कॉलनी, त्रिवेणी नगर येथे पुलाच्या निविदेच्या कामामध्ये दिरंगाई होत असल्यामुळे लोकांना व रहदाऱ्यांना त्रास होत आहे.

स्पिल कामाच्या यादी मध्ये या पुलाची मागणी बरेच वर्षांपासून होत आहे. सदर टाईम्स कॉलनीच्या पुलाचे काम कधी सुरु होणार?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता, वार्ड क्र.०३, महानगरपालिका औरंगाबाद.**

वॉर्ड क्र.२४ अंतर्गत औरंगाबाद टाईम्स कॉलनी नाल्यावर आर.सी.सी.पुल बांधणे करीता सर्वेक्षण करणे, आर.सी.सी. डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे, इत्यादी कामासाठी कोटेशन मागविले असता, कोटेशन धारकांनी योग्य दर न भरल्याने मंजुर झाले नाही. परत डिझाईनसाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

**प्रश्न क्रमांक ६२८:-**

शहागंज पाण्याच्या टाकीतुन प्रत्येक वार्डाला पाणी पुरवठा चार दिवसानंतर करतात. पाणी प्रत्येक वार्डाला दररोज किंवा एक दिवसानंतर देण्यासंबंधी काही नियोजन केलेले आहे का?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद शहराची आजची लोकसंख्या साधारणतः १४ लक्ष असून यासाठी जायकवाडी जलाशयातुन २२७ दलली दररोज पाणी उचल होणे आवश्यक आहे. तथापी, अस्तीत्वातील योजनांची महत्तम क्षमता पाहता जायकवाडी जलाशयातुन दररोज १५० ते १५५ दलली पाणी उचल करण्यात येत असून शहरास जलशुध्दीकरण केंद्र व्यय व मार्गस्थ ग्राहकांना पाणी दिल्यानंतर निव्वळ १२५ ते १३० दलली पाणी पुरवठा केला जातो.

शहरामध्ये दररोज पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेने समांतर जलवाहिनी योजेनेचे नियोजन केलेले आहे. योजनेची कामे पूर्ण होऊन योजना कार्यान्वीत झाल्यानंतरच दररोज पाणी पुरवठा करता येईल.

**स.पालिका सदस्या श्रीमती माधुरी मिलींद देशमुख (प्रभाग क्रमांक-८०)**

**प्रश्न क्रमांक ६२९:-**

**उत्तर:- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्रश्न क्र. | विचारलेली माहिती | माहिती |
|---|---|---|
| 629 | शहरामध्ये फवारणी ,धुर फवारणी,अबेट व तत्सम कामासाठी प्रत्येकी किती कर्मचारी उपलब्ध आहेत? | मलेरिया विभागामध्ये एकुण 89 कर्मचारी कार्यरत आहेत त्यापैकी 02 वरिष्ठ क्षेत्र कर्मचारी व 04 क्षेत्रीय कर्मचारी इतर विभागामध्ये कार्यरत आहेत.तसेच आरोग्य केंद्रामार्फत स्टाफ नर्स 36,ए एन एम 107,आशा वर्कर 69,एमपी डब्ल्यु 25 यांच्या मार्फत अबेट ट्रिटमेंट चे काम करण्यात येते. |
| | सदरील कामे किती दिवसांनी वैद्यकीय दृष्टीने करणे अपेक्षित आहे? | अबेट आठवडयातुन एकदा ,स्प्रेईंग आठवडयातुन एकदा व डेंग्यु / चिकन गुनिया चा रुग्ण आढळल्यानंतर आजुबाजूच्या 50 घरांमध्ये धुर फवारणी करणे.व इतर कामे गरजेनुसार उदा.गप्पी मासे सोडणे,नाल्यांमध्ये एमएलओ ऑईल ची फवारणी इ. |

<table>
<tr><td rowspan="7"></td><td>फवारणी व इत्यादी करतांना त्यामध्ये कोणते औषध असते त्याचे काय प्रमाण असते?</td><td colspan="4">अळीनाशके :-1.अबेट 20 मिली+980 मिली पाणी.<br>2.बि.टी.आय लिक्वीड 100 मिली + 10 लिटर पाणी.<br>किटकनाशके :-1.डेल्टामेथ्रीन(2.5%)400 मिली+10 लि.पाणी.<br>2.पायरेथ्रम- हॅण्ड फॉगींगसाठी 4 लिटर डिझेलमध्ये 250 मि.ली.पायरेथ्रम+1 लिटर पेट्रोल.<br>- व्हेईकल माऊंटेड :- 40 लिटर डिझेलमध्ये 2.5 लिटर पायरेथ्रम +7 लिटर पेट्रोल .</td></tr>
<tr><td rowspan="5">धुर फवारणी व औषध फवारणीसाठी किती यंत्रे आपल्याकडे वार्ड निहाय उपलब्ध आहे?</td><td>यंत्रसामुग्री</td><td>दुरुस्त</td><td>नादुरुस्त</td><td>एकुण</td></tr>
<tr><td>फवारणी पंप</td><td>100</td><td>00</td><td>100</td></tr>
<tr><td>फॉगींग मशीन</td><td>12</td><td>13</td><td>25</td></tr>
<tr><td>फिरते फवारणी यंत्र</td><td>03</td><td>00</td><td>03</td></tr>
<tr><td>व्हेईकल माऊंटेड मशीन</td><td>02</td><td>00</td><td>02</td></tr>
<tr><td></td><td>एकुण यंत्रसामुग्री</td><td>117</td><td>13</td><td>130</td></tr>
<tr><td></td><td>या फवारणीच्या औषधांवर जसे अबेट,फवारणी मधील औषध,धुर फवारणी किती रुपये महिन्याला खर्च येतो? तसेच सदरील आरोग्याशी निगडीत कामे न करणाऱ्या विरुध्द कोणत्या स्वरुपात (दिवाणी/फौजदारी) कायदेशीर दाद मागता येते? याची व वरील सविस्तर माहिती द्यावी.</td><td colspan="4">या फवारणीच्या औषधांवर जसे अबेट,फवारणी मधील औषध,धुर फवारणीसाठी अंदाजे 8,12,250/- रुपये महिन्याला खर्च येतो.</td></tr>
</table>

त्याच प्रमाणे मा.आयुक्त यांना दिलेल्या मलेरिया विभागाचा अहवाल खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **निरिक्षण** | **सूचविलेली उपाययोजना** |
|---|---|---|
| 1 | जानेवारी -2016 पासून आरोग्य विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या आकडेवारी नुसार मनपाकडे जानेवारी – 2016 ते सप्टेंबर-2016 पर्यंत 156 संशयित डेंग्यू रुग्ण व 21 निश्चित रुग्ण व शासनाच्या मलेरिया विभागाने 35 निश्चित रुग्ण, मलेरियाचे 05 रुग्णांची नोंद आहे. हे सर्व रुग्ण शहराच्या विविध भागांतून आढळून आलेले आहेत. प्रत्यक्षात खाजगी रुग्णालयांमधून आधिक केसेस असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे युध्दपातळीवर डास प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची तातडीने गरज आहे. | शहरामध्ये 166 अतिजोखमीचे भाग जाहीर झालेले आहेत. तसेच डासांची घनता व हाऊस इंडेक्स वाढलेले 33 विभाग आढळून आले आहेत. प्रथम त्या 33 विभागामधून डास नियंत्रणाबाबत Integreated Vector Management ची धडक कार्यवाही आरोग्य केंद्रामार्फत व मलेरिया विभागा मार्फत सुरु करणे योग्य. वॉर्ड ब व वॉर्ड ई हे साथीची उगमस्थाने प्रथमदर्शनी दिसून येत आहेत. त्यामुळे तेथे प्राधान्याने काम करणे योग्य |

| | | |
|---|---|---|
| 2 | मलेरिया विभागमध्ये जीवशास्त्रज्ञ हे पद रिक्त आहे व ज्या वैद्यकीय अधिकारी यांच्या कडे प्रभारी जीवशास्त्रज्ञ पद होते त्या वैद्यकीय रजेवर आहेत. | शासनाकडून त्वरीत जीवशास्त्रज्ञ पद भरणे योग्य. तो पर्यंत दुसरे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांना अतिरिक्त कार्यभार देणे योग्य. |
| 3 | मलेरिया विभागामध्ये वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, संगणक ऑपरेटर, सेवक इ. कर्मचा-यांची आवश्यकता आहे. | मलेरिया विभागामध्ये वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, संगणक ऑपरेटर, सेवक इ. कर्मचारी तात्काळ आस्थापना विभागामार्फत देणे योग्य. |
| 4 | मलेरिया विभाग हा आरोग्य विभागाचा एक अविभाज्य भाग आहे. या विभागाचे 50% काम मलेरिया विभागातून व 50% काम आरोग्य केंद्रामधून चालते यातून या दोन्ही विभागामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. | आरोग्य केंद्राच्या माध्यमातून तसेच आरोग्य केंद्र कर्मचारी व आशा वर्कर यांच्या मार्फत अबेटचे काम सुरु करणे. आरोग्य विभाग व मलेरिया विभागाने समन्वयाने काम करणे योग्य.तसेच खाजगी नर्सिंग स्कुल्स व महिला बचत गट यांचीही मदत घेणे योग्य. |
| 5 | **<u>मनुष्यबळ :-</u>**<br>नागरी हिवताप योजना औरंगाबाद शहरात 1978 च्या आसपास लागू झाली आहे. त्यानंतर शहर झपाटयाने वाढले. परंतु वाढलेल्या शहरासाठी अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी मिळाले नाहीत.<br>इ.स.2005-06 ला सिडकोचे हस्तांतरण महानगरपालिकेमध्ये झाले परंतु नागरी हिवताप योजना सिडको विभागासाठी लागू नसल्याने त्या विभागाचे खाजगीकरण करण्यात आलेले होते. परंतु 1 जानेवारी 2016 पासून सिडको विभागाचे खाजगी कंत्राटदार बंद करण्यात आल्याने सिडको विभागात कर्मचा-यांची कमतरता जाणवत आहे. सातारा व देवळाई नव्याने सामाविष्ट झाल्याने मनपाचा स्टाफ देणे आवश्यक आहे. | सध्या डेंग्यूचे रुग्ण वाढत असल्याने घनकचरा व्यवस्थापनातील खाजगी लेबर स्पलायर्स यांच्या कडून सिडकोसाठी 50 व सातारा, देवळाई परिसरासाठी 20 कर्मचारी त्वरीत उपलब्ध करुन घेणे योग्य |
| 6 | <u>मशिनरी :-</u><br>सद्यस्थितीत शहरात 12 फॉगींग मशीन चालू आहेत शहरासाठी त्या अतिशय कमी आहेत.13 फॉगींग नादुरुस्त असून 30 फॉगींग मशीन पुर्णत: निकामी झालेल्या आहेत.नादुरुस्त फॉगींग मशीन औरंगाबाद मध्ये दुरुस्त करता येत नाहीत.<br>खाजगी कंत्राटदार यांच्याकडे 12 चालु स्थितीमध्ये फॉगींग मशीन आहेत. | पुणे येथे सहसंचालक मलेरिया यांच्याकडे मनपाचे वाहन पाठवून 13 फॉगींग मशीन त्वरित दुरुस्त करुन घेणे योग्य.खाजगी कंत्राटदार हे त्यांच्याकडील 12 फॉगींग मशीन देण्यास तयार आहेत.तरी मनपाकडे हस्तगत करणे योग्य. |
| 7 | <u>किटकनाशके / अळीनाशके :-</u><br>डेल्टामॅथ्रीन,पायरेथ्रम या किटकनाशक चा साठा मध्य ऑगस्ट पासून निरंक आहे तसेच उर्वरित | महा-टेंडर प्रसिध्द होऊन मंजूर होण्यासाठी एक महिना लागु शकतो तो पर्यंत आपतकालीन परिस्थिती म्हणून शासनाचे मंजूर किंवा मनपाच्या मागील मंजूर दराने किटकनाशके एक महिन्याचा साठा |

| | | |
|---|---|---|
| | किटकनाशके फक्त एक महिना पुरतील इतके शिल्लक आहे.किटकनाशक खरेदीची प्रक्रीया महा-टेंडर कडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे.शासनाकडे किटकनाशकांचा साठा उपलब्ध नाही असे लेखी दिले आहे. | त्वरित खरेदी करणे योग्य. |
| 8 | शासनाच्या मलेरिया विभागाकडून प्राप्त अहवालानुसार जुलै 2016 मध्ये मनपाच्या 20 आरोग्य केंद्रामधून मलेरिया साठी घेण्यात आलेले रक्त नमुने 15% पेक्षा कमी आहेत. | सर्व आरोग्य केंद्रामधून प्रत्येक तापांच्या रुग्णांचे रक्त नमुने घेणे बंधनकारक करणे.ज्या आरोग्य केंद्रामध्ये प्रयोगशाळा उपलब्ध आहेत त्या ठिकाणी मलेरियाची रक्तमुने तपासणी उपलब्ध करुन देणे योग्य |
| 9 | <u>दैनंदिन अहवाल:-</u><br>मलेरिया आणि आरोग्य विभागा या दोन्ही विभागाच्या अहवाला मध्ये तफावत आहे | मलेरिया व आरोग्य विभाग यांनी समन्वयाने अहवाल तयार करणे योग्य |
| 10 | <u>वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण :-</u><br>शासनाकडून सायफनोथ्रीन फॉगिंगसाठी नवीन औषधी आलेली आहे तसेच NUHM मध्ये वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची निवड झाली आहे. अबेट हे औषध घरांमधून टाकतांना त्याचा डोस बरोबर टाकण्यात येत नाही. त्यामुळे डास अळी नष्ट होत नाहीत. | वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे त्वरीत प्रशिक्षण आयोजित करणे योग्य |
| 11 | <u>आरोग्य शिक्षण :-</u><br>सध्या गणपती उत्सव असल्याने जनजागरणाची मोठी संधी उपलब्ध झालेली आहे. युध्दपातळीवर जनजागरण करणे योग्य वाटते. | शासनाकडून मा.ना.डॉ. दिपक सावंत सार्वजणिक व कुटूंब कल्याण मंत्री यांचा आरोग्य संदेश शासनाच्या सूचनेनुसार सी.डी. च्या प्रति करुन शहरातील मोठया गणेश मंडळांना वाटप करणे योग्य. तसेच IMA कडून जनजागरणासाठी होर्डिंग्स व पोस्टर्स प्राप्त झालेले आहेत. ते ही गणेश मंडळांच्या दर्शनी भागात लावणे योग्य. |
| 12 | सध्या तापाच्या रुग्णात वाढ होत आहे. अतिजोखमेच्या विभागामध्ये रोगनिदान शिबिर सध्या चालू नाहीत. | अतिजोखमीच्या विभागामध्ये सर्व आरोग्य केंद्रा मार्फत दुपारी 3.00 ते 5.00 या वेळेत रोगनिदान शिबिराचे आयोजन करणे योग्य |
| 13 | Mosquito Abatement Comittee ची मिटींग 18 जुलै 2016 रोजी झाली आहे. त्यानंतर झाली नाही. | Mosquito Abatement Comittee ची मिटींग त्वरीत घेणे योग्य |
| 14 | मलेरिया चा डास नाल्यात व घाणेरडया पाण्यात अंडी घालतो त्यामुळे नालेसफाई वारंवार होणे गरजेचे आहे<br>छोटया नाल्यांचे पाणी वाहते करण्यासाठी फावडापार्टी उपलब्ध नाही. | नालेसफाई वारंवार होणे योग्य<br>एक सिडकोसाठी व एक शहरासाठी 2 फावडापार्टी तयार करणे योग्य. |

| | | |
|---|---|---|
| 15 | किटकनाशके तयार करण्यासाठी फॉगींग मशीन्स मध्ये डिझेल व पेट्रोल लागते.सध्या डिझेलच्या पावत्या दिल्या जातात परंतु पेट्रोल चा अग्रीम लेखा विभागाकडून मिळण्यास विलंब होतो. | डिझेल प्रमाणे पेट्रोलच्या पावत्या देणे योग्य. |
| 16 | संपुर्ण शहरात फिरते फवारणी यंत्र (ट्रॅक्टर) द्वारे औषध फवारणी करणा-या तीन खाजगी कंत्राटदारांना सध्या कार्यादेश नाहीत. | सध्या तातडीची बाब म्हणुन दि.01 सप्टेंबर 2016 ते दि.30 सप्टेंबर 2016 पर्यंत मा.आयुक्तांच्या अधिकारात कार्यादेश देणे योग्य.मागील कामास स्थायी समितीकडून कार्योत्तर मंजुरी घेणे योग्य. |
| 17 | शहरामध्ये डेंग्यु केसेसचा SPOT MAP करणे अपेक्षित होते परंतु ते झाले नाही. | SPOT MAP तयार करणे चालु आहे. |
| 18 | शहरात बांधकाम व कन्स्ट्रकशन चे काम चालु असल्याने त्या ठिकाणी डास उत्पत्ती स्थाने नष्ट करण्यासाठी संबधितास नोटीस बजावणे करिता BYLAWS तयार करणे आवश्यक आहे. | BYLAWS तयार करण्यात आले असून मा.आयुक्तांच्या मंजूरी नंतर मा.सर्वसाधारण सभेला मंजुरीस देणे योग्य. |
| 19 | मलेरिया विभागातील 02 वरिष्ठ क्षेत्र कर्मचारी व 05 क्षेत्र कर्मचारी इतर विभागात कार्यरत आहेत. | त्वरित मलेरिया विभागात रुजु करणे योग्य. |

**प्रश्न क्रमांक ६३०:-**

शहर सिडको-हडको व वॉर्ड क्र.८० मधील मनपाच्या खुल्या जागा व उद्याने हे महानगरपालिकेच्या कोणत्या विभागाच्या अखत्यारीत येतात? सदर खुल्या जागेची/उद्यानाची साफसफाई, झाडणे, गवत काढणे, हे कोणत्या विभागाने केले पाहिजे? याचा खुलासा व्हावा. संबंधीत अधिकाऱ्यांची नावे व मोबाईल क्रमांक देण्यात यावे.

**उत्तर:- उद्यान अधिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद.**

वॉर्ड क्र.८० मधील एन-३, केटली उद्यान व एन-४, एच-सेक्टर उद्यानांची साफसफाई, झाडणे, गवत काढणे, ई.कामे उद्यान विभागामार्फत केली जाते. शहर, सिडको-हडको मधील मनपाच्या १११ उद्यानाची कामे या विभागामार्फत करण्यात येतात. ज्या जागा विकसीत केलेल्या नाही किंवा त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था नाही झाडे, हिरवळ, बाडी, लागवड केलेली नाही अशी खुल्या जागेची साफसफाई, झाडणे, गवत काढणे ई.कामे उद्यान विभागामार्फत केली जात नाही.
अधिकाऱ्याचे नांव:- श्री.व्हि.बी.पाटील मो.९४०४०००३४.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (अ,क, व ड), तथा मालमत्ता विभाग प्रमुख, महानगरपालिका औरंगाबाद.**

सन २००६ मध्ये सिडको हस्तांतराच्या वेळी खुल्या जागा, उद्याने, रस्ते, ड्रेनेज इत्यादी हस्तांतरीत झालेले आहे.

त्यापैकी उद्याने हे उद्यान विभागाच्या अखत्यारीत येतात व खुल्या जागा या प्रभाग अधिकारी यांच्या देखरेखी खाली असतात. प्रभाग क्र.८० या वॉर्डामध्ये सिडको कडून हस्तांतरीत झालेले प्ले ग्राऊंड, खुल्या जागा व उद्यान इत्यादीची यादी खालील प्रमाणे आहे.

**एन-४, सेक्टर एच**

| अ.क्र. | पॉकेट नं | प्रकार | क्षेत्रफळ चौ.मी. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | जी-१ | गार्डन | ३१८२.५६६ चौ.मी. | |
| २. | जी-२ | गार्डन | १५२३ चौ.मी. | |
| ३. | पी.जी. -१ | प्ले ग्राऊंड | १७८४.१०९ चौ.मी. | |
| ४. | पी.जी. -२ | प्ले ग्राऊंड | २७.०३.१२७ चौ.मी. | |
| ५. | पी.जी. -३ | प्ले ग्राऊंड | १३८२.९५२ चौ.मी. | |
| ६. | पी.जी. -४ | प्ले ग्राऊंड | ६५१२.१५९ चौ.मी. | |
| ७. | पी.जी. -५ | प्ले ग्राऊंड | ४३८७.६०८ चौ.मी. | |
| ८. | ओ-१ | खुल्या जागा | ३६३४.८३४ चौ.मी. | |
| ९. | ओ-२ | खुल्या जागा | १८३३.०४५ चौ.मी. | |
| १०. | ओ-२ | खुल्या जागा | १३४५ चौ.मी. | |

**एनएच-३**

| अ.क्र. | पॉकेट नं | प्रकार | क्षेत्रफळ चौ.मी. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | जी-१ | गार्डन | २६३० चौ.मी. | |
| २. | जी-२ | गार्डन | ७८२२.२६९ चौ.मी. | |
| ३. | पी.जी. -१ | प्ले ग्राऊंड | ११२३.४५५ चौ.मी. | |
| ४. | पी.जी. -२ | प्ले ग्राऊंड | ४४२९.२९३ चौ.मी. | |
| ५. | पी.जी. -३ | प्ले ग्राऊंड | १५५२.७६६ चौ.मी. | |
| ६. | पी.जी. -४ | प्ले ग्राऊंड | ६६७६.१०५ चौ.मी. | |
| ७. | ओ-१ | खुल्या जागा | २३१८.९४ चौ.मी. | |
| ८. | ओ-२ | खुल्या जागा | १०६९.३५२ चौ.मी. | |
| ९. | ओ-३ | खुल्या जागा | १३०६.३९४ चौ.मी. | |

**प्रश्न क्रमांक ६३१:-**

शहरामध्ये एकुण किती पाण्याच्या टाक्या आहेत. (सिडको-हडको सहित) त्या कोठे कोठे आहेत? त्याची साठवण क्षमता किती आहे? प्रत्येकाची वेगळी माहिती देण्यात यावी. त्यावरून होणारा पाणीपुरवठा कोण कोणत्या भागात होतो त्याची नावे, लोकसंख्या, वार्ड निहाय खुलासा करण्यात यावा.

तसेच दरडोई (प्रत्येक माणसाला) किती लिटर पाणी दररोज देणे आवश्यक आहे? सिमेंट पाईपचे आयुष्य किती आहे? सिमेंट पाईप किती वर्ष चांगले राहु शकतात? वरील पाण्याच्या टाक्या किती दिवसांनी/महिन्यांनी स्वच्छ करणे अपेक्षीत आहे? वरील टाक्या कधी स्वच्छ केलेल्या आहेत त्याची तारीख देणे. दिनांक २४ जुलै ते २४ ऑगस्ट या महिन्यात एन-५ च्या पाण्याच्या टाकीवर किती एम.एल.डी.पाणी आले? तसेच याच महिन्यात वार्ड-क ८० मध्ये पाणी गढुळ/ड्रेनेज युक्त देण्याचे कारण काय?

पाण्याचे शुध्दीकरण करण्यासाठी क्लोरीन व इतर औषधींची किती मात्रा वापरण्यात येते? या सर्वांची नोंद ठेवण्यात येते का? कोठे ठेवण्यात येते? वार्ड क्र.८०, एन-३, एन-४, परिजातनगर गुरूसहानी नगर येथे जुन्या पाईपलाईन जीर्ण झालेल्या आहेत त्या बदलणे आवश्यक आहे. त्याच्या बाबत काही तरतुद? कार्यवाही कधी होणार?

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक ६३२:-**

पहिली सर्वसाधारण सभा सन-२०१५ ते ऑगस्ट-२०१६ पर्यंत एकुण किती सर्वसाधारण सभा झालेल्या आहेत? पहिल्या सर्वसाधारण सभे पासुन आजपर्यंत झालेल्या सभेत कोणकोणते प्रस्ताव/ठराव मंजुर झाले व त्याबाबत पुढे काय कार्यवाही झाली? व काही कार्यवाही झाली नसेल तर त्याचे कारण काय? मंजुर प्रस्ताव/ठराव व मागीतलेली माहिती मुद्दे निहाय, सर्वसाधारण सभेच्या तारीख निहाय सविस्तर खुलाशासह देण्यात यावी. झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, विषय पत्रिकेसोबत देण्याचे बंधनकारक असतांना का देण्यात येत नाही? त्याचा खुलासा व्हावा व मागील व येथून पुढील सर्व इतिवृत्त देण्यात यावे. सर्वसाधारण सभेसाठी कमीत कमी सात दिवस आधी प्रश्न द्यावे. तर मग ह्या प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी प्रश्न विचारल्यावर किती दिवसात उत्तर द्यावे? याचा काही नियम नाही का? वरील सर्व प्रश्नांचा सविस्तर खुलासा सर्वसाधारण सभेच्या ७ दिवस आधी देण्यात यावा.

**उत्तर:- नगर सचिव विभाग, महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र.क्र. | प्रश्न | खुलासा |
|---|---|---|
| ६३२ | पहिली सर्वसाधारण सभा सन-२०१५ ते ऑगस्ट-२०१६ पर्यंत एकुण किती सर्वसाधारण सभा झालेल्या आहेत? पहिल्या सर्वसाधारण सभे पासुन आजपर्यंत झालेल्या सभेत कोणकोणते प्रस्ताव/ठराव मंजुर झाले व त्याबाबत पुढे काय कार्यवाही झाली? व काही कार्यवाही झाली नसेल तर त्याचे कारण काय? मंजुर प्रस्ताव/ठराव व मागीतलेली माहिती मुद्दे निहाय, सर्वसाधारण सभेच्या तारीख निहाय सविस्तर खुलाशासह देण्यात यावी. झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, विषय पत्रिकेसोबत देण्याचे बंधनकारक असतांना का देण्यात येत नाही? त्याचा खुलासा व्हावा व मागील व येथून पुढील सर्व इतिवृत्त देण्यात यावे. सर्वसाधारण सभेसाठी कमीत कमी सात दिवस आधी प्रश्न द्यावे. तर मग ह्या प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी प्रश्न विचारल्यावर किती दिवसात उत्तर द्यावे? याचा काही नियम नाही का? वरील सर्व प्रश्नांचा सविस्तर खुलासा सर्वसाधारण सभेच्या ७ दिवस आधी देण्यात यावा. | सन २०१५ पासून एकूण २७ सर्वसाधारण सभा घेण्यात आलेल्या आहेत.<br>या सभेत एकूण प्रस्ताव क्रमांक ०१ ते ५७३ प्रस्ताव घेण्यात आलेले आहे.<br>मंजूर प्रस्तावा बाबत अंमलबजावणी करणेचे काम त्या त्या संबंधीत विभागाने कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. तथापि, कामाची निकड लक्षात घेता संबंधीत विभागास आवश्यकते नुसार प्रस्तावाचा कारणापुरता उतारा प्रत त्वरीत देण्यात येते.<br>जानेवारी २०१६ पर्यंतच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यात आलेले आहे त्यापुढील इतिवृत्तांत तयार करण्याचे काम कार्यवाही अंतर्गत असून लवकरात लवकर तयार करण्यात येत आहे.<br>पालिका सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत सभा कामकाम नियमावलीचे प्रश्नाबाबतचे विशेष (जादा नियम) नियम क्र.१०६ नुसार सभेच्या पहिल्या दिवशीपर्यंत उत्तर देणे अपेक्षीत आहे. |

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.